नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक २८ * * चंद्रपूर * सोमवार, दिनांक २८ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## अनिल अंबानींच्या कंपन्यांवर ईडीची कारवाई

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २७ :

अनिल अंबानी यांच्या रिलायन्स ग्रुपशी संबंधित ३५ हून अधिक ठिकाणी अंमलबजावणी संचालनालयाचे (ईडी) छापे रविवारी पूर्ण झाले. ही कारवाई २४ जुलै रोजी सुरू झाली आणि तीन दिवस चालली. या छाप्यात सुमारे ५० कंपन्या सहभागी आहेत. २५ हून अधिक लोकांची चौकशीही करण्यात आली आहे. रिलायन्स ग्रुपच्या कंपन्या रिलायन्स पॉवर आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने रविवारी एक्सचेंज फाइलिंगद्वारे ही माहिती दिली. दोन्ही कंपन्यांनी स्टॉक एक्सचेंजला सांगितले की, या कारवाईचा त्यांच्या व्यवसायावर, आर्थिक कामगिरीवर किंवा शेअरधारकांवर कोणताही परिणाम होणार नाही.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## ऐक्याचा पोवाडा

आज उद्धवजींच्या वाढदिवसा निमित्ताने राजसाहेब मातोश्रीमध्ये आले. त्या निमित्ताने दुरावा दूर झाला स्नेहबंध जवळ आला. बाळासाहेब ठाकरे यांची ठाकराई किंवा ठाकरी शैलीने दोन सख्ख्या चुलत आणि मावसबंधूंच्या चुकांना दुरुस्त करण्याची संधी घेऊन उज्वल भविष्यकाळाच्या अपेक्षेने मनोमालिन्य दूर केले आहे. या भेटीमुळे मनोमालिन्य मनोमिलनात परिवर्तित होऊन महाराष्ट्राच्या मराठी जनांच्या आणि भारतीय मानसाच्या अंतरंगात प्रवाही होत राहो. हीच या दोघांची कामना असेल. आपण जेव्हा मराठी मराठी म्हणतो, तेव्हा इतर भाषेविषयी आपल्या मनात अनादर आहे असे अजिबात नाही. मात्र या राज्यात राहणाऱ्या परप्रांतीयांनी राज्यात फक्त प्रवासी म्हणून येऊ नये?. तर वर्षानुवर्ष राहिल्यावर खरे निवासी म्हणून रहावे आणि खऱ्या अर्थाने निवासी म्हणून राहायचे असेल. तर या राज्याची भाषा आत्मसात केली पाहिजे अशी अपेक्षा असली तर त्यात गैर आहे काय आहे. याचे उत्तर शोधायला गेले तर ते अजिबात गैर नाही असे सगळेच जण म्हणतात. आमचे अनेक नातलग तामिळनाडू मध्ये राहतात. तीस ते चाळीस वर्षांपूर्वी मराठी भाषेत शिकलेल्या आमच्या दोन बंधूंनी त्यावेळच्या मद्रास शहरात आपली दुकाने थाटली. शाळेत फारसे हुशार नसलेले आमचे दोन्ही बंधू एका वर्षाच्या आत अस्खलित तामिळमध्ये बोलू लागले. याचा अर्थ असा आहे की, ज्या ठिकाणी आपण राहतो तेथील भाषा शिकणे अशक्य अजिबातच नाही, इच्छा किंवा सदिच्छा असली तर सर्व काही शिकता येते. मात्र विनाकारण मुजोरी करायची असेल तर आम्ही स्थानिक भाषा शिकणार नाही आणि बोलणारही नाही अशा बेमुवर्तखोरी मुजोऱ्या करता येतात. अशाच बेशरम आणि बेमुवर्तखोर असणाऱ्या माणसांविरुद्ध महाराष्ट्राचा, मराठी माणसाचा आणि मराठी अस्मिता जपणाऱ्यांचा प्रचंड विरोध आहे. मुंबई किंवा महाराष्ट्रात जितक्या खुल्या मनाचे लोक राहतात. तितक्या खुल्या मनाची माणसे केवळ भारतातच नाही, तर जगात सुद्धा फारच कमी असतात. साधी हिंदी भाषा शिकण्याची गोष्ट घेतली तरी स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या शिक्षणक्रमात पाचवीपासून हिंदी भाषा सर्व विद्यार्थी शिकतच होते. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरात पाच-सहा वर्षाच्या मुलाला शालेय अभ्यासक्रमात भाषा नसली तरी हिंदी शिकवण्याची गरजच नसते. ग्रामीण भागात तेव्हाही आणि आताही मराठी बोलल्याशिवाय पर्याय नसतो. आपल्या महाराष्ट्रातील जेवढे जेवढे बिगर मराठी भाषिक खेड्यापाड्यात राहतात, त्या सर्वांना मराठी भाषा अस्खलितपणे बोलता येते. भाषेबाबत अत्यंत कडवे आणि जागृत असलेले कन्नडीसुद्धा महाराष्ट्रात गेल्या पंचवीस वर्षापासून मराठीत बोलतात. म्हणजे ते त्या ठिकाणी स्थायिक झालेले असतील, त्यामुळेच मराठीत बोलतात. ते सगळेजण महाराष्ट्राचे सणही साजरे करतात आणि कधीही आपल्या मातृभाषेचा दुराग्रह करीत नाहीत. हे निरीक्षण आम्ही अत्यंत बारकाईने नोंद करून घेतलेले आहे. महाराष्ट्रातील अतिशय पराक्रमी मराठी माणसे जेव्हा जेव्हा इतर राज्यांमध्ये गेली. त्या ठिकाणी मोठा पराक्रम करून त्यांनी त्या राज्यात मराठा राज्य स्थापले. परंतु राज्यकारभाराची भाषा मराठी केली नाही, ही गोष्ट सुद्धा अवश्य सर्वांनीच लक्षात ठेवावी. बडोद्याचे गायकवाड गुजराती भाषा आत्मसात करते झाले. इंदूरचे होळकर इंदोरी-हिंदी म्हणजेच माळव्याची भाषा बोलू लागले. ग्वाल्हेरच्या शिंदे यांनी तर आपले आडनावच बदलून शिंदे ऐवजी सिंदीया करून टाकले. याचाच अर्थ मराठी मानस सर्वसमावेशी आहे. हेच यातून अगदी परिपूर्ण सिद्ध होते. खुद्द बाळासाहेब ठाकरे यांनीही मराठी आणि हिंदुत्वाची मशाल हाती घेतल्यावरती अनेक हिंदी भाषिक आणि अगदी मुसलमानांनाही अनेक मोठमोठी पदे दिली. जे मराठीचे चाहते होते आणि महाराष्ट्राच्या सौख्याची भाषा करीत होते, त्या सर्वांना बाळासाहेबांनी न्याय दिला. आताच्या उद्धव आणि राज यांच्या मनोमिलनानंतर या दोन्ही बंधूनी आणखी शब्दच्छल न करता किंवा वेगळे आळोखपिळोखे न देता किंवा पुनश्च रहस्यमय भाषा न वापरता आम्ही आता एक होत आहोत आणि एकत्रच राहू, अशी घोषणा करावी. त्यातूनच 'बहु असोत तर सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे दोघांनीही जाहीर करावे. हाच ऐक्याचा पोवाडा पुढील कितीतरी दशके दुमदुमत राहील. मग आता विनाकारण वेळ न दवडता आरपारची लढाई लढण्यासाठी ऐक्याच्या घोड्यावर स्वार होऊन आपल्या मनातील मराठी बाणा यथार्थ करावा. हीच आमची मनीषा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मनसा देवी मंदिरात चेंगराचेंगरी

## ६ जणांचा मृत्यू

## २९ जण जखमी



■ वृत्तसंस्था, हरिद्वार, दि. २७ :

हरिद्वारमधील मनसा देवी मंदिरात आज एक मोठी दुर्घटना घडली. सकाळी मंदिराच्या पदपथावर झालेल्या चेंगराचेंगरीत सहा भाविकांचा मृत्यू झाला आणि सुमारे ३६ जण जखमी झाले. सावन आणि रविवार असल्याने आज मनसा देवी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. मंदिराच्या पायऱ्यांवर लोकांची गर्दी होती, तेव्हा अचानक चेंगराचेंगरी झाली. काही लोकांचे म्हणणे आहे की मंदिरात वीज प्रवाहित झाल्याच्या अफवेमुळे घबराट पसरली आणि पायऱ्यांवरून पडून लोकांचा मृत्यू झाला. हरिद्वार पोलिसही मंदिरात वीज प्रवाह पसरल्याच्या वृत्ताला अफवा म्हणत आहेत. मंदिरात गर्दी जमल्यामुळे हा अपघात झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

फूटपाथवर प्रसाद दुकान चालवणारे अवधेश म्हणाले की, वृद्ध महिला पडली आणि त्यानंतर गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी सुरू झाली. त्यांनी सांगितले की कोणताही वायर तुटलेला नाही आणि विजेचा धक्काही लागला नाही, ही फक्त एक अफवा होती. आज गर्दी वाढल्यानंतरही प्रशासनाने ये-जा करण्यासाठी फक्त एकच मार्ग ठेवला, त्यामुळे फूटपाथवर पाय ठेवायलाही जागा नव्हती. कावड काळात, भाविक पायऱ्यांवरून मंदिराकडे जात असत आणि मागच्या मार्गाने खाली येत असत, म्हणजेच येण्याचा मार्ग वेगळा होता आणि परत जाण्याचा मार्ग वेगळा होता. एका दुकानदाराने सांगितले की, लोक जीव वाचवण्यासाठी दुकानात घुसले. एका छोट्या दुकानात ५०-६० लोक घुसले ज्यामुळे दुकानदारही बेशुद्ध पडला. चेंगराचेंगरीच्या खुणा पुसण्यासाठी प्रशासनाने तुटलेल्या तारा आणि विखुरलेल्या चप्पल काढून टाकल्या, परंतु प्रसाद दुकानांखाली अजूनही चेंगराचेंगरीच्या खुणा दिसतात.

मनसा देवी मंदिरात पाणी अर्पण करण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होती आणि संपूर्ण मार्ग भाविकांनी खचाखच भरलेला होता. त्यानंतर विजेचा धक्का बसल्याची अफवा पसरली आणि चेंगराचेंगरी झाली. मनसा देवी मंदिरात बसवलेल्या विजेच्या खांबात ठिणगी पडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मंदिरात वीज पडल्याची अफवा पसरली. वरच्या मंदिरात उपस्थित असलेले भाविक खाली धावले आणि मधून जाणारे लोक एकमेकांवर पडले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यापैकी अनेकांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर काही वेळातच मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी हरिद्वारला पोहोचले आणि त्यांनी रुग्णालयात दाखल असलेल्या जखमींची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांनी सांगितले की या प्रकरणाची चौकशी एका दंडाधिकाऱ्यांकडून केली जात आहे.

मुख्यमंत्र्यांनी अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आणि सांगितले की, या दुःखाच्या वेळी राज्य सरकार पीडितांसोबत आहे. जखमींना लवकर बरे व्हावे अशी शुभेच्छा देत धामी म्हणाले की, त्यांनी अधिकाऱ्यांना जखमींना योग्य उपचार देण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना घटनेची माहिती दिली जात आहे. त्यांनी सांगितले की, जखमींना आणि मृतांच्या नातेवाईकांना हरिद्वारहून त्यांच्या गावी पाठवण्याची व्यवस्था उत्तराखंड सरकारकडून केली जाईल. मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

## राज ठाकरे ६ वर्षांनी मातोश्रीवर

### उद्धव ठाकरेंना दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे रविवारी ६ वर्षांनी उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी मातोश्रीवर पोहोचले. यावेळी राज यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मिठी मारली आणि नंतर त्यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

याआधी राज ठाकरे यांनी शेवटचे ६ वर्षांपूर्वी २०१९ मध्ये मातोश्रीला भेट दिली होती. त्यांनी त्यांचा मुलगा अमित ठाकरे यांच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी उद्धव कुटुंबाला आमंत्रित केले होते. राज यांनी २०१२ मध्ये औपचारिकपणे मातोश्रीला भेट दिली होती. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे आजारी होते.

५ जुलै रोजी २० वर्षांनंतर मुंबईतील वरळी डोम येथे झालेल्या सभेत उद्धव आणि राज एकत्र दिसले. यावेळी दोघांनीही भविष्यात एकत्र राजकारण करण्याचे संकेत दिले. उद्धव यांना शिवसेनेचे प्रमुख बनवल्यानंतर राज यांनी मनसे हा वेगळा पक्ष स्थापन केला होता. त्यावेळी दोघांमधील संबंध चांगले नव्हते.

## महाराष्ट्राच्या मनात काय आहे

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसेल : मुख्यमंत्री



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे विधानसभा निवडणुकीत दिसले, पुढे होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही ते दिसेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधतांना म्हणाले.

शिवसेना (ठाकरे गट) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवशी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मातोश्रीला जाऊन उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे दिसेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली होती. याकडे फडणवीस यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले दोन्ही भाऊ वाढदिवसाला भेटले याचा आनंदच आहे. पण, त्याचे राजकारण होऊ नये, महाराष्ट्राच्या मनात काय आहे हे विधानसभा निवडणुकीत दिसले. आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही दिसेल.

मात्र, काही राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे सांगता येणार नाही तसेच त्यांच्या मनात जे आहे तेच महाराष्ट्राच्या मनात आहे असे म्हणणेही योग्य नाही. मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांशी संवाद ठेवावा, सामंजस्य दाखवावे, काही अडचणी असेल तर मला सांगाव्या, पण पत्र लिहून नाराजी व्यक्त करणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी महायुती सरकारमधील शिवसेना आणि भाजप मधील मंत्र्यांमधील वादावर व्यक्त केली. सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यात खात्याच्या बैठकांवरुन जुंपली आहे.

## तीन वर्षांच्या मुलाचा वाहून गेल्याने मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २७ :

सकाळी सहा वाजताच्या सुमारास चिमुकला घराजवळील नाल्याच्या काठावर शौचास बसलेला असताना त्याचा तोल जाऊन तो थेट नाल्यात पडून वाहत जात असताना मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवारी (ता.२७ जुलै) घडली असुन, सुशांत ईश्वर उपरीकर (वय ३ वर्षे) रा. कुडेगाव असे घटनेत मृत्यू झालेल्या चिमुकल्याचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, कुडेगाव येथील ईश्वर उपरीकर यांचे मांदिड कुडेगाव रस्त्यावर नाल्या शेजारी घर असून सकाळी ईश्वर उपरीकर यांच्या पत्नीने त्यांचा मुलगा सुशांतला सकाळीच नाल्याच्या काठावर शौचास बसवून पाणी आणण्यासाठी गेली. दरम्यान सुशांत तोल जाऊन तो पाण्यात पडला. नाला तुडुंब भरून असल्याने तो जवळपास २०० मीटर वाहत गेला.

यादरम्यान, आईने येऊन बघितले असता त्या ठिकाणी बाळ न दिसल्याने तिने आरडाओरड केली. आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी धाव घेतली आणि शोधमोहीम सुरू केली.

दरम्यान, गावातीलच तरुणांनी त्या नाल्यात शोध मोहिमेला सुरुवात केली. अखेर तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर बाळाचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच लाखांदूर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी लाखांदूर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

यावेळी लाखांदूरचे तहसीलदार वैभव पवार तसेच लाखांदूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सचिन पवार, पोलिस हवालदार लोकेश वासनिक, सतीश सिंगनजुडे महसूल विभागाचे मंडळ अधिकारी कौरवार, तलाठी खामणकर, तलाठी वाघमारे घटनास्थळी उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनात पुढील कायदेशीर प्रक्रिया पार पडत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण कुडेगाव गावात शोककळा पसरली असून, परिसरातील नागरिकांनी कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत धीर दिला आहे.

## बिहारमधील मतदार यादीतून ६५ लाख नावे वगळली

■ वृत्तसंस्था, पटना, दि. २७ :

निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्तीच्या पहिल्या टप्प्याचा डेटा जारी केला आहे. त्यानुसार, बिहारमध्ये आता ७.२४ कोटी मतदार आहेत. पूर्वी हा आकडा ७.८९ कोटी होता. मतदार यादी पुनरावृत्तीनंतर, ६५ लाख नावे यादीतून वगळण्यात आली आहेत.

काढून टाकलेल्या नावांमध्ये अशा लोकांचा समावेश होता जे आता हयात नाहीत, किंवा कायमचे इतरत्र राहत आहेत, किंवा ज्यांची नावे दोन मतदार यादीत नोंदलेली आहेत. यापैकी २२ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. ३६ लाख मतदार स्थलांतरित झाल्याचे आढळून आले आहे, तर ७ लाख लोक आता दुसऱ्या भागात कायमचे रहिवासी झाले आहेत. ही मोहीम २४ जून रोजी सुरू करण्यात आली.

## रेव्ह पार्टीत एकनाथ खडसेंच्या जावयाला अटक

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २७ :

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते आमदार एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. रेव्ह पार्टीतून ही अटक करण्यता आली आहे. प्रांजल हे शरद पवार गटाच्या महिला प्रदेश अध्यक्षा रोहिणी खडसे यांचे पती आहेत. प्रांजल खेवलकर यांना पुणे शहरातील खराडी परिसरातील एका सोसायटीमध्ये रेव्ह पार्टी केल्या प्रकरणी गुन्हे शाखेकडून करण्यात आलेल्या कारवाई दरम्यान अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खराडी परिसरातील एका सोसायटीमध्ये मध्यरात्रीच्या सुमारास प्रांजल खेवलकर हे त्यांच्या मित्रा सोबत पार्टी करीत होते. याबाबत माहिती मिळाली असता, आमच्या टीमने छापा टाकला. त्यावेळी त्या कारवाईमध्ये दारु, गांजा आणि हुक्का हा साठा आढळून आला आहे. तर या कारवाईमध्ये प्रांजल खेवलकर यांच्यासह पाच पुरुष आणि दोन महिलांना ताब्यात घेतले आहे. रेव्ह पार्टी प्रकरणात जावयावर कारवाई झाल्याने आता एकनाथ खडसेंवर टीका केली जाते आहे.

एकनाथ खडसेंचा जावई प्रांजल खेवलकरला फ्लॅटमधे पार्टी करताना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. पुण्यातील खराडी भागातील एका सोसायटीतील फ्लॅटमधे पार्टी सुरु होती. या पार्टीत दारु, हुक्का आणि काही प्रमाणात अंमली पदार्थांचे सेवन होत असल्याचा पोलिसांचा दावा आहे.

# आयुष्याची सजावट करणाऱ्या उपकृतांप्रती ऋणानुबंधाचा भाव



वक्तादशसहस्त्रेशु डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचे सत्काराला उत्तर

लहानपणापासूनच रामायण, महाभारत, वेद, उपनिषद, साहित्य याचे बाळकडू त्यांना मिळाले आणि यातूनच त्यांच्या बुद्धीला अलौकिकता प्राप्त झाली. त्यांच्या वक्तृत्वात तत्व,तंत्रज्ञान व तत्वज्ञान याची उत्तम सांगड दिसून येते. प्रसंगावधान, अनुरूप मांडणी व अमोघ वाणी त्यांच्या वक्तृत्वाची खासियत आहे. देशातील हॉस्पिटलचे रूपांतरण मेडिकल कॉलेज व पॅरामेडिकल कोर्सेस मध्ये करण्याकरिता ॲक्ट प्रस्तावित करण्यात आला त्याची पार्श्वभूमी डॉक्टर वेद प्रकाश मिश्रा यांनी लिहिलेले आहे.

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

अनेक यशपयशातून ध्येयाकडे आगेकुच करीत असताना, मार्ग आपले असतात, पाऊले आपली असतात पण या मार्गातून चालत असताना आप्तजनांच्या उदार भावनेतून मिळणाऱ्या मदतीच्या हातांनी आपण उपक्रम होत असतो. यामुळे मानवाचे जीवन सजत असते आणि या सजावटीप्रती केवळ ऋणानुबंध हाच अनुभाव असू शकतो असा भाव डॉ.वेदप्रकाश मिश्रा यांनी त्यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभाला उत्तर देताना व्यक्त केला.

सामाजिक शैक्षणिक आरोग्य अशा सर्व क्षेत्रात अग्रणी व मानाचे स्थान असणारे व वक्ता म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची मान उंचावणारे वक्ता दशहस्त्रेषु डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्याविषयी अभिमान व्यक्त करण्यासाठी त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम वनामतीमध्ये आयोजित करण्यात आला होता. हा सत्कार नागपूर शहराचे अग्रणी व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम व डॉ. अशोक अढाउ डॉ.फिरदोस मिर्झा यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गिरीश गांधी यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले.

यावेळी डॉ. मिश्रा पुढे म्हणाले की, स्वकीय यांच्या प्रेरणेतून माणूस हा सजतो, सवरतो व पुरस्कृत होत असतो. या प्रेरणेतून येणारी प्रामाणिकता, उदार मार्गदर्शन, निर्देशांक यातून जीवनाचे दिग्दर्शन होत असते. यावेळी त्यांनी सांगितले की देशाच्या वैद्यकीय व्यवस्थेला स्थायीभाव देण्याचे कार्य नितीन गडकरी यांनी केले आहे. यावेळी त्यांनी जीवनाची मार्गदर्शक त्यांची आई व गुरु उषा मिश्रा यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दत्ता मेघे, गिरीश गांधी, अटलबहादुर यांच्यासारख्यांचे मार्गदर्शन लाभले नसते तर जीवन सर्वसाधारण बनवून राहिले असते असाही भाव त्यांनी व्यक्त केला.

यावेळी नितीन गडकरी म्हणाले की नागपूरची प्रतिष्ठा, नागपूरचा नावलौकिक सातासमुद्र पार नेणाऱ्या थोड्या थोडक्यांमध्ये मिश्रा यांचे नाव येते. श्रद्धांजली पासून तर सत्कारापर्यंतचे सर्व कार्यक्रम ते यथाचित पार पाडू शकतात. यावेळी पद्मश्री डॉक्टर चंद्रशेखर मेश्राम म्हणाले की, विद्यालय व शालेय जीवनात अनेक पुरस्कार प्राप्त व आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती प्राप्त डॉ. वेदप्रकाश मिश्रा सारखे मित्र लाभणे ही मानाची गोष्ट आहे.

यावेळी त्यांनी प्लास्टिकच्या प्रदूषणावर भाष्य करत म्हटले की आज प्लास्टिकचे प्रदूषण ही मोठी गंभीर समस्या आहे. या प्रदूषणामुळे अनेक अल्झायमर सारखे व पॅरालिसीस सारखे आजार मानवाला होत आहे यावर जनजागृती होणे आवश्यक आहे. डॉ.गिरीश गांधी यांनी आपल्या भाषणामध्ये म्हटले की जगात केवळ ज्ञानी असून उपयोगाचे नाही तर या ज्ञानाचा जगाला उपयोग झाला पाहिजे.

विद्वत्ता, वक्तृत्व, कर्तुत्व एका ठिकाणी सापडणे फार कठीण आहे. पण ही अलौकिक गोष्ट यांच्यामध्ये दिसून येते. त्यांनी युनो व युनेस्कोचे प्रतिनिधित्व केले आहे. याशिवाय डब्ल्यू. एच.ओ. आयोजित वर्ल्ड हेल्थ असेम्ब्ली मध्ये संबोधित करण्याचा मानही त्यांना मिळाला आहे. आरोग्य क्षेत्रातील बी.सी.रॉय हा मानाचा पुरस्कार मिळवून त्यांनी देशाची प्रतिष्ठा उज्वलित केलेली आहे. यावेळी डॉक्टर अशोक आढाऊ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गिरीश गांधी, संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. सभागृहात सांस्कृतिक, साहित्यिक, वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.


# लाडकी बहीण योजनेतून २६ लाख बहिणी अपात्र

## जूनपासूनचे पैसे येणे बंद होणार : अदिती तटकरे यांची माहिती

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २७ :

लाडकी बहीण योजनेचा लाभ तब्बल १४ हजार २९८ पुरुषांनी घेतल्याचे उघड झाले असून, यामुळे योजनेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणावर आता विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेत भ्रष्टाचाराचे आरोप सरकारवर केले आहेत. सरकारनेही या प्रकाराची गंभीर दखल घेत योजनेत अपात्र ठरलेल्या या सर्व पुरुषांना योजनेतून वगळले आहे. केवळ इतकेच नाही, तर २६.३४ लाख महिलाही या योजनेतून अपात्र ठरण्याची शक्यता असल्याची माहिती राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. या महिलांचे अर्ज तपासणीअंती अयोग्य आढळले असून, त्यांची शहानिशा सुरू आहे.

राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अल्पावधीतच लोकप्रिय झाली. या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यात दरमहा थेट १५०० जमा होतात. या योजनेला राज्यभरातील महिलांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. मात्र, याच योजनेच्या लाभात गैरवापराचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आदिती तटकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत याबद्दल माहिती दिली आहे. त्या म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व अर्जांची ओळख पटवण्यासाठी महिला व बालविकास विभागाने शासनाच्या सर्व विभागांकडून माहिती मागवली होती. यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाने सुमारे २६.३४ लाख लाभार्थी अपात्र असताना देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती सादर केली आहे.




यात काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये २ पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे, तर काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. या माहितीच्या आधारे जून २०२५ पासून या २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त पात्र असलेल्या सुमारे २.२५ कोटी पात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना जून २०२५ महिन्याचा सन्माननिधी वितरित करण्यात आला आहे.

तात्पुरत्या स्वरूपात लाभ स्थगित केलेल्या २६.३४ लाख लाभार्थ्यांच्या माहितीची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून शहानिशा करून त्यापैकी जे लाभार्थी पात्र ठरतील त्यांचा लाभ शासनातर्फे पुन्हा सुरू करण्यात येईल.

## जावयाला पुण्यात रेव्ह पार्टीतून अटक

### त्यांना अडकवण्याचा प्रयत्न होतोय : एकनाथ खडसे



**जळगाव :** पुणे शहरातील खराडी परिसरात सुरु असलेल्या रेव्ह पार्टीवर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर रंगेहाथ पकडले गेले आहेत. गेल्या काही दिवसांपासून एकनाथ खडसे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्यात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर खडसे यांच्या जावयाची अटक झाल्याने चर्चेला आणखी उधाण आले आहे. हे होणारच होते, मला आधीच माहीत होते. अनेक दिवसांपासून विरोधात बोलणाऱ्यांना अडवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे हा देखील त्याचाच एक भाग असू शकतो, असा संशय एकनाथ खडसे यांनी व्यक्त केला आहे. खराडीमधील उच्चभ्रू वसाहतीतील एका महागड्या फ्लॅटमध्ये ही रेव्ह पार्टी सुरू होती. ऑनलाईन बुकिंगद्वारे घेण्यात आलेल्या या ठिकाणी दारू, हुक्का आणि अमली पदार्थ आढळल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी या पार्टीत सहभागी असलेल्या पाच जणांना अटक केली असून, त्यात तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. यात प्रांजल खेवलकर यांचे नाव असल्याने प्रकरण अधिक गाजू लागले आहे. या घटनेनंतर एकनाथ खडसे यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना आपल्या पहिल्या प्रतिक्रिया दिल्या. यासंदर्भातील माहिती मला तुमच्याकडूनच मिळते आहे आणि हे होणारच होते, हे मला आधीच माहीत होते, असे सांगत खडसे यांनी या कारवाईमागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, अनेक दिवसांपासून विरोधात बोलणाऱ्यांना अडवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी : संजय राऊत



**मुंबई :** पुण्यातील खराडी भागात सुरू असलेल्या हाय-प्रोफाईल रेव्ह पार्टीवर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांच्यासह सहा जणांना ताब्यात घेतल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ माजली आहे. या घडामोडीवर आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी थेट भाजपवर घणाघात केला आहे. संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी आहे. अशा पद्धतीने पार्टी केल्याशिवाय हनीट्रॅप करता येत नाही, अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे. जेव्हा तुमच्यावर उलटेल तेव्हा महाग पडेल, असा इशाराही संजय राऊत यांनी दिला आहे. संजय राऊत यांनी नुकताच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी संजय राऊत यांना पुण्यातील रेव्ह पार्टीबद्दल विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी थेट भाष्य केले. तुमचा संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी आहे, असा आरोप संजय राऊतांनी केला.

## खडसे बोलले म्हणून जावयावर कारवाई?

### विरोधकांचा आवाज दाबला जातो– सुषमा अंधारे



**मुंबई :** रेव्ह पार्टीचा बनाव करत एकनाथ खडसे यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचा आम्ही निषेध व्यक्त करतो. जो सरकारविरोधात बोलतो त्यांच्या मागे चौकशी लावली जाते. देवेंद्र फडणवीस साहेब स्वायत्त यंत्रणांचा गैरवापर किती करावा यासाठी काही मर्यादा आहेत की नाही असा सवाल ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकरवर आज झालेली कारवाई म्हणजे स्वायत्त यंत्रणांचा गैरवापर करत बोलणाऱ्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न आहे. खडसे आणि खडसेंसारखा बोलणाऱ्या अनेक लोकांच्या साठी हा एक संदेश आहे, चुप बैठो नही तो रेड करुंगा असे म्हणत ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या की, स्वायत्त यंत्रणांचा किती आणि कसा गैरवापर करावा हे भाजपकडून शिकले पाहिजे. मागच्या काही वर्षांपासून हे सर्व देशाला सर्वश्रूत आहे. संजय राऊत सरकारविरोधात बोलत होते म्हणून त्यांच्या मुलीच्या लग्नातील मेहंदीच्या खर्चापर्यंत ईडी यंत्रणा पोहोचली आणि त्यांच्यावर कारवाई झाली. त्यानंतर नवाब मलिकांनी बोलायला सुरवात केली आणि त्यांच्यासह जावयावर कारवाई करण्यात आली.

## एकनाथ खडसेंना ट्रॅपची माहिती होती तर जावयांना अलर्ट करायचे ना : गिरीश महाजन



**मुंबई :** मला पुण्यातील रेव्ह पार्टीबद्दल काही माहिती नव्हते. पण अनेक फोन आल्याने मी बातम्या पाहिल्यावर मला लक्षात आले की आमचे नेते नाथाभाऊ यांचे जावई हे एका रेव्ह पार्टीमध्ये पकडले गेले आहेत. त्यांनीच ह्या पार्टीचे आयोजन केल्याची माहिती देखील मला मिळाली, असे म्हणत मंत्री गिरीश महाजन यांनी रेव्ह पार्टी प्रतिक्रिया दिली आहे. गिरीश महाजन पुढे बोलताना म्हणाले की, या रेव्ह पार्टीमध्ये दारु, हुक्का आणि ड्रग्ज मोठ्या प्रमाणात मिळून आले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी एकनाथ खडसे यांच्या जावयांना ताब्यात घेतल्याचे मी बातम्यामध्ये पाहिले आहे. या प्रकरणी मी काही माहिती अजून घेतलेली नाही.

## तरुणीला धमकावून मोटारीत सामूहिक बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २७ :

लोणावळा परिसरात पादचारी तरुणीला धमकावून तिच्यावर मोटारीत सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री घडली. याप्रकरणी पोलिसांनी तीन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके तयार केली आहेत.

याबाबत पीडित तरुणीने लोणावळा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणावळ्यातील तुंगाली गाव परिसरातून तरुणी शुक्रवारी सायंकाळी निघाली होती. पीडित तरुणीला मोटारीतून आलेल्या तिघांनी धमकावले. तिला धमकावून मोटारीत बसण्यास सांगितले. तिचा मोबाइल संच हिसकावून घेतला. त्यानंतर तरुणीचे हात-पाय बांधले. तरुणीला मोटारीतून वेगवेगळ्या भागांत नेण्यात आले. मोटारीत तिच्यावर तिघांनी बलात्कार केला, असे पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. तरुणीला नांगरगाव परिसरात सोडून मोटारीतून आरोपी पसार झाले. तेथे घाबरलेल्या अवस्थेत तरुणी थांबली होती. स्थानिक रहिवाशांनी तरुणीला जवळच्या एका मंदिरात सुरक्षित नेले. त्यानंतर रहिवाशांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पीडित तरुणीची वैद्यकीय तपासणी करून जबाब नोंदवला.

## म्हाडाच्या उपनिबंधकाच्या पत्नीची गळफास घेत आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

म्हाडाच्या उपनिबंधकाच्या पत्नीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मुंबई येथील कांदिवली आकुर्ली परिसरात ही घटना घडली आहे. म्हाडाचे उपनिबंधक बापू कटरे यांच्या पत्नीने पतीच्या जाचाला कंटाळून हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे समजते. 44 वर्षीय रेणु कटरे यांनी राहत्या घरी गळफास लाऊन आपले जीवन संपवले. शनिवारी रात्री उशिरा ही घटना घडली असून पैशांच्या कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद झाल्यानंतर हा प्रकार घडला असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रेणु कटरे या शिक्षिका होत्या आणि पती बापू कटरे यांच्यासोबत त्या आकुर्ली येथे राहत होत्या. दोघांमध्ये आर्थिक कारणावरून नेहमीच वाद व्हायचे. शनिवारी रात्री देखील दोघांमध्ये वाद झाल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. त्यानंतर काही वेळाने रेणु यांनी राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेने कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. परंतु, रेणु यांचे भाऊ वकील नितीन शेवाळ यांनी ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा संशय व्यक्त केला आहे. त्यांनी थेट पती बापू कटरे यांच्यावर गंभीर आरोप करत बहिणीचा छळ केल्याचे म्हटले आहे.

वकील नितीन शेवाळ यांनी समतानगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, समतानगर पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली आहे. तसेच त्यांनी पुढील तपास देखील सुरू केला आहे. घटनास्थळी जाऊन पोलिसांनी पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. रेणु कटरे यांच्या मृत्यू मागील कारण नेमके काय आहे, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. मात्र, रेणु यांच्या कुटुंबीयांनी जो संशय व्यक्त केला आहे, त्यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. त्यानुसार पोलिस तपास करत आहेत.

## दाऊद टोळीशी संबंधित गुंडाला गुजरातमधून अटक

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २७ :

दाऊद टोळीशी संबंध असल्याचा संशय असलेला आरोपी सरवर खानला शस्त्र पुरवणाऱ्याला गुजरातमधून अटक करण्यात आली. दीपक नंदकिशोर शर्मा (३२) असे अटक आरोपीचे नाव आहे. आरोपीविरोधात यापूर्वीही नऊ गुन्हे दाखल आहेत. गुन्हे शाखेच्या तपासानुसार, आरोपी शर्मा याची ठाणे कारागृहात सरवर खानसोबत ओळख झाली होती. सरवर खानने अपहरण करण्यासाठी वापरलेले पिस्तुल शर्माने दिल्याचा आरोप आहे.

गुन्ह्यात आधीच अटकेत असलेल्या आरोपींच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी शर्माला गुजरातमधून शोधून काढले आणि त्याला मुंबईत आणण्यात आले आहे. अमली पदार्थ तस्करीचा गुन्हा असलेल्या साजिद इलेक्ट्रिकवाला आणि त्याचा साथीदार शब्बीर सिद्दीकी यांचे मुंबईतून अपहरण करण्यात आले होते.

सरवर खानने खंडणीची मागणी करताना इलेक्ट्रीकवाला यांच्या कपाळावर पिस्तूल ठेवले होते. ती पिस्तूल शर्मा याच्याकडे सापडली असून त्याच्याकडून पाच जिवंत काडतूसांसह ती जप्त करण्यात आली आहे. शर्माला यापूर्वी २०२१ मध्ये दहिसरमधील गोळीबार प्रकरणात अटक करण्यात आली होती. तो ठाणे कारागृहात सुमारे सात महिने होता. त्याचदरम्यान त्याची सरवर खानसोबत ओळख झाली होती. शर्मा हा एक सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर मुंबई, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमध्ये एकूण नऊ गुन्हे दाखल आहेत.

इलेक्ट्रिकवाला व त्याचा साथीदार शब्बीर यांना मुंबईत जबरदस्तीने मोटरगाडीत बसवून त्यांचे अपहरण करण्यात आले होते.

## मोरा बंदरात बोट बुडून खलाशाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
उरण, दि. २७ :

शनिवारी (२६ जुलै) ला अलिबागच्या खांदेरीच्या परिसरात करंजा येथील एक बोट बुडाल्या नंतर रात्री उशिरा मोरा बंदरात खालाशाना घेऊन येणाऱ्या छोट्या बोटीला अपघात झाला असून यात एकाचा बुडून मृत्यू झाला आहे. सुरेश गौतम(२२) असं या खलाशाच नाव असून तो उत्तर प्रदेशातील रहिवाशी आहे.

या संदर्भात मोरा सागरी पोलिसात नोंद करण्यात आली आहे. तर मृत खलाशाचा मृतदेह उरणच्या इंदिरा गांधी रुग्णालयात नेण्यात आला आहे. शनिवारी रात्री ओहटीच्या वेळी मोरा बंदराच्या नजीक असलेल्या मोरा मुंबई रो रो च्या जेट्टी जवळ मोठी मासेमारी बोट उभी करण्यात आली होती. या बोटीच्या दुरुस्ती साठी काही कारागीर छोटी बोट घेऊन गेले होते. ते रात्रीच्या वेळी परतत असतांना समुद्राला आलेली भरती आणि वादळी वाऱ्याने ही सहा ते सात जणांना घेऊन किनाऱ्यावर येणारी बोट उलटली.

त्यातील पाच जण पोहून किनाऱ्यावर आले. मात्र एकाला पोहतांना दम लागल्याने तो भरतीच्या मोठ्या लाटेत बुडाला. त्याचा मृतदेह रविवारी सकाळी किनाऱ्यावर लागल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी हा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला आहे. मोरा बंदरातील बोट दुर्घटनेतील मृत हा सुतार काम करणाऱ्याच्या हाताखाली काम करणारा मजूर होता.

त्याला जास्त पोहता येत नसल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला असावा असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास मोरा सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बबन सोनवणे हे करीत आहेत.

## कोल्हापुरी चप्पल विकल्या जातील क्युआर कोडसह

■ महासागर प्रतिनिधी,
कोल्हापूर, दि. २७ :

भारतातील सर्वात प्रतिष्ठित पारंपारिक हस्तकलेपैकी एक असलेल्या कोल्हापुरी चप्पलला केवळ देशांतर्गत फॅशन जगातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही लोकप्रियता मिळत आहे. इटालियन ब्रँड प्राडावर या चप्पलचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. त्याच्या गुंतागुंतीच्या कारागिरी आणि सांस्कृतिक वारशासाठी प्रसिद्ध आणि भौगोलिक निर्देशक दर्जा असलेले हे हस्तनिर्मित चामड्याची चप्पल आता क्युआर कोडच्या स्वरूपात सुरक्षा आणि प्रामाणिकपणाच्या अतिरिक्त थरासह उपलब्ध राहणार.

याचे श्रेय अलीकडील तंत्रज्ञान आणि कायदेशीर नवोपक्रमाला जाते. महाराष्ट्राच्या लेदर इंडस्ट्री डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनया अधिकाऱ्यांनी सांगितले की, बनावट कोल्हापुरी चप्पलची विक्री थांबवणे, प्रत्येक उत्पादनामागील कारागिराची ओळख दर्शविणे, ग्राहकांचा विश्वास वाढवणे आणि पारंपारिक कारागिरांची बाजारपेठेतील स्थिती मजबूत करणे हे या पावलाचे उद्दिष्ट आहे. अलिकडेच, कारागिरांनी इटालियन लक्झरी फॅशन ब्रँड प्राडाच्या नवीन संग्रहात कोल्हापुरी चप्पलसारखे



दिसणारे पादत्राणे समाविष्ट करण्याविरुद्ध निषेध केला होता आणि GI अधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला होता.

या वादानंतर, प्राडाने कबूल केले की २०२६ च्या पुरुषांच्या फॅशन शोमध्ये प्रदर्शित केलेले सँडल पारंपारिक भारतीय हस्तकला पादत्राणांपासून प्रेरित होते. तथापि, ब्रँडने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सला दिलेल्या उत्तरात स्पष्ट केले आहे की प्रदर्शित केलेले सँडल डिझाइन टप्प्यात आहेत आणि त्यांचे व्यावसायिक उत्पादन अद्याप निश्चित झालेले नाही. प्राडाच्या तज्ञांच्या पथकाने या महिन्याच्या सुरुवातीला कारागिरांशी संवाद साधण्यासाठी आणि स्थानिक शू-स्लिपर उत्पादन प्रक्रियेचे मूल्यांकन करण्यासाठी कोल्हापूरला भेट दिली.

१२ व्या शतकातील, ही चप्पल प्रामुख्याने महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यात तयार केली गेली आहे.

नैसर्गिकरित्या टॅन केलेल्या चामड्याने आणि हाताने विणलेल्या पट्ट्यांपासून बनवलेली, त्यांची विशिष्ट रचना कारागिरांच्या पिढ्यांनी जतन केली आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जेव्हा दूरदर्शी शासक छत्रपती शाहू महाराजांनी स्वावलंबन आणि स्वदेशी अभिमानाचे प्रतीक म्हणून याचा प्रचार केला तेव्हा त्याला मोठी चालना मिळाली. त्यांनी या चप्पलांच्या वापराला प्रोत्साहन दिले, ज्यामुळे ग्रामीण हस्तकला एक आदरणीय कुटीर उद्योगात विकसित होण्यास मदत झाली.

या सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्यासाठी आणि कारागिरांना योग्य मान्यता मिळावी यासाठी, महाराष्ट्र आणि कर्नाटक सरकारने २०१९ मध्ये संयुक्तपणे चप्पलसाठी जीआय दर्जा मिळवला. लिडकॉमने प्रत्येक चप्पलच्या जोडीसाठी क्यूआर-कोडेड प्रमाणपत्र सुरू केले आहे, असे निवेदनात म्हटले आहे. कोड स्कॅन करून, खरेदीदार कारागीर किंवा उत्पादन युनिटचे नाव आणि स्थान, महाराष्ट्रातील उत्पादन जिल्हे, हस्तकला तंत्र आणि वापरलेला कच्चा माल, जीआय प्रमाणपत्राची वैधता आणि स्थिती यासारखी माहिती मिळवू शकतात.

## मराठवाड्यात मुसळधार पावसाचा धुमाकूळ

■ महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर, दि. २७ :

मराठवाड्यात पावसाने दमदार पुनरागमन केले आहे. विभागातील तब्बल 44 महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 15, नांदेड जिल्ह्यातील 10, हिंगोली जिल्ह्यातील 9, जालना जिल्ह्यातील 9 आणि लातूर जिल्ह्यातील 1 महसूल मंडळांचा समावेश आहे.

मागील सलग तीन दिवस मराठवाड्यात जोरदार पाऊस बरसला. त्याआधी जवळपास वीस दिवस पावसाने मराठवाड्याकडे पाठ फिरवली होती. तसेच मराठवाड्यातील लहान-मोठ्या सिंचन प्रकल्पांमध्येही पुरेसा जलसाठा होऊ शकला नव्हता. 24 जुलैपासून पावसाला पुन्हा सुरुवात झाली आणि संपूर्ण मराठवाडा ओलाचिंब झाला. अनेक छोटे प्रकल्प पाण्याने भरून गेले. काही जिल्ह्यांत नदी, नाले आणि ओढ्यांना पूर आला.

शनिवारी सकाळी 8 वाजेपासून रविवारी 8 वाजेपर्यंतच्या चोवीस तासांत मराठवाड्यात सरासरी 32.9 मिमी पावसाची नोंद झाली. हिंगोली जिल्ह्यात सर्वाधिक 52.4 मिमी पाऊस बरसला. त्यापाठोपाठ जालना जिल्ह्यात 47.1 मिमी पावसाची नोंद झाली. सर्वात कमी 15.5 मिमी पाऊस परभणी जिल्ह्यात झाला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 39.2 मिमी, नांदेड जिल्ह्यात 38.5 मिमी, लातूर जिल्ह्यात 25.7 मिमी, बीड जिल्ह्यात 19.6 मिमी आणि धाराशीव जिल्ह्यात 16.9 मिमी पावसाची नोंद झाली.

## तेराव्या माळ्यावरून पडून रंगारीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
कल्याण, दि. २७ :

कल्याण पश्चिमेतील चिकनघरमध्ये एका इमारतीच्या तेराव्या माळ्यावरील सदनिकाच्या खिडकीच्या बाजुला रंगकाम करत असलेला एक ४६ वर्षीय रंगारी तोल जाऊन इमारती खालील खोल खड्ड्यात पडला. या रंगारीला रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी जाहीर केले. मणकेश सिताराम चव्हाण (४६) असे रंगाऱ्याचे नाव आहे. ते रंगारी म्हणून काम करतात. या मजुराच्या मृत्युप्रकरणी कामगार ठेकेदार गुड्डुकुमार कसौधन (३५) यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात माहिती दिली. पोलिसांनी तपास करून भारतीय न्याय संहितेच्या २०२३ कलम १९४ प्रमाणे अपमृत्युची नोंद केली आहे.

## अखेर सुनील बागूल आणि मामा राजवाडेंचा भाजपमध्ये प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. २७ :

शिवसेना ठाकरे गटाचे माजी उपनेते सुनील बागूल आणि माजी महानगरप्रमुख मामा राजवाडे यांनी आज नाशिकमध्ये मोठ्या शक्ती प्रदर्शनासह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत या पक्षप्रवेश कार्यक्रमात बागूल, राजवाडे यांच्यासोबत शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.



शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस राज्यभर ठिकठिकाणी साजरा केला जात असतानाच, नाशिकमध्ये भाजपने ठाकरे गटाला मोठा धक्का दिला आहे. विशेष म्हणजे, पक्षप्रवेशावेळी गिरीश महाजन यांनी सुनील बागूल यांना काहीशा कडक शब्दांत तंबी दिल्याचेही पाहायला मिळाले.

या पक्षप्रवेश सोहळ्यात बोलताना मंत्री गिरीश महाजन म्हणाले, सुनील भाऊ यांचा हा शेवटचा प्रवेश आहे. परत आता इकडे-तिकडे जाऊ नका. मागच्या वेळी बडगुजर आले, सर्वांना भाजपमध्ये यावे, असे वाटते आहे. नरेंद्र मोदी नावाचे वादळ राज्यात देशात नाही तर जगभर आहे. जगात कुठेही जा मोदी, इंडीया, भारत याच नावाची चर्चा आहे. पोपटपंची करणारे खूप लोक आहेत. सकाळ पासून काही लोक सुरू होतात, असे म्हणत संजय राऊत यांच्यावर महाजन यांनी निशाणा साधला.

पुढे बोलताना गिरीश महाजन म्हणाले, त्यांच्याकडे कोणी राहिले नाही. बडगुजर होते, नंतर मामा राजवाडे होते, ते ही आता आले आहेत. आता कोण आहे गिते. त्यांना आपल्याला घ्यायचे नाही. आता, भाजप हाऊसफुल्ल झाले आहे. आता कोणाला घ्यायचे नाही, असे म्हणत महाजन यांनी माजी आमदार वसंत गीते यांच्यावर अप्रत्यक्ष टोला लगावला आहे.

गिरीश महाजन म्हणाले, कोट्यवधी घरात मोदींनी गॅस दिला. लाडकी बहीण योजना सुरू आहे, काहींना भांडे वाटप केले जात आहे. कोरोना काळात संकट आले, त्याचे रूपांतर संधीत केले आणि औषध निर्माण केले. पाकिस्तान, चीन किती त्रास देत होते. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर सर्वांनी धडकी घेतली आणि भारताच्या नादी लागायचे नाही, असे ठरवले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अनोखी मानवंदना

### पुण्यातील साई मित्र मंडळाचा गणेशोत्सवात महिलांच्या हाती सर्व कारभार देण्याचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २७ :

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या जयंतीचे यंदाचे ३०० वे वर्ष आहे. विविध कार्यक्रमातून, उपक्रमातून त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. एकीकडे गणेशोत्सवाला यंदा महाराष्ट्र सरकारने राज्य उत्सव म्हणून मान्यता द्यायचा निर्णय घेतला असताना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या साई मित्र मंडळाने यंदाच्या वर्षी मंडळाचा सर्व कारभाराची दोरी महिलांच्या हातात देण्याचा औचित्यपूर्ण निर्णय घेतला आहे. यंदा महिलांच्या हाती कारभार देत मंडळ वेरुळ येथील कैलास मंदीर साकारणार आहे. या देखाव्याच्या कामाचे कळसपूजन मंत्री




चंद्रकांत पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले, यावेळी केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी ही घोषणा केली.

कोथरूड परिसरातील केंद्रीय मंत्री मोहोळ संस्थापक असलेले श्री साई मित्र मंडळ हे भव्य व देखण्या प्रतिकृती गणेशोत्सवात सादर करण्यासाठी प्रसिद्ध आहे. यंदाच्या वर्षी ३० वा गणेशोत्सव साजरा करण्यासाठी, अशीच भव्य, आकर्षक आणि कलात्मक प्रतिकृती सादर करताना मंडळाची धुरा महिलांच्या हातात त्यांनी दिली आहे. यंदाच्या उत्सवाचे सर्व संयोजन महिला भगिनी करणार आहेत. त्यांना सहाय्यक म्हणून पुरूष कार्यकर्ते काम करणार आहेत. भारतीय शिल्पकारांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका पाषाणात कैलास लेणीची केलेली निर्मिती हे जगभरासाठी आश्चर्य ठरले आहे. ही लेणी बघण्यासाठी लाखोंच्या संख्येने परदेशी पर्यटक दरवर्षी वेरूळला भेट देतात. या सजावटीच्या कामाच्या कळस पूजनाचा शुभारंभ यावेळी प्रसिद्ध मूर्ती आणि मंदिर अभ्यासक गणेश धालपे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. गेल्यावर्षी अयोध्येतील श्रीराम मंदिराची प्रतिकृती मंडळाने केली होती.

याबाबत केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, गणेश मंडळांचा मुख्य कारभार पुरूष मंडळींच्याच हातात असतो. मंडळातील महिला भगिनी काम करतातच, मात्र त्यांना खुले व्यासपीठ मिळत नाही. मात्र हे चित्र बदलायचे असून यंदाचे अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीचे ३०० वे वर्षे आपण साजरे करत आहोत. त्यानिमित्ताने आमच्या मंडळातील महिला भगिनी अनोखी आदरांजली वाहतील. अहिल्यादेवींच्या चरित्रापासून महिला वर्गाला स्फूर्ती मिळावी आणि त्यांचा सार्वजनिक कामातील माताभिगीनींचा आत्मविश्वास, सहभाग वाढवण्यासाठी आम्ही सर्वांनी ही निर्णय घेतला आहे.

# एआय आणि नाविन्यता एकत्र: सॅमसंगकडून मुंबईमध्ये फ्यूचर-फॉरवर्ड बिझनेस एक्स्पेरिअन्स स्टुडिओ लाँच

**मुंबई, २७ जुलै :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने मुंबईतील गोरेगाव पूर्व येथील इंटरनॅशनल बिझनेस पार्कमधील ओबेरॉय कॉमर्झ-२ च्या २व्या मजल्यावर अत्याधुनिक बिझनेस एक्स्पेरिअन्स स्टुडिओ (बीईएस) लाँच केला आहे.

हा भविष्य-केंद्रित स्टुडिओ बी२बी सहयोगींना एकीकृत व्यवसाय सोल्यूशन्सची व्यापक श्रेणी देण्यासाठी अत्याधुनिक सॅमसंग डिवाईसेसदरम्यान असलेल्या विनासायास परस्पर कार्यक्षमतेला दाखवतो. ६,५०० चौरस फूट जागेवर विस्तारलेले शोरूम व्यवसायांना व्यावसायिक क्षेत्रांच्या व्यापक श्रेणीमध्ये शोध, नियोजन व नाविन्यता आणण्यास साह्य करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. बीईएस, मुंबई गुरूग्राममधील सॅमसंगच्या विस्तृत एक्झिक्युटिव्ह ब्रिफिंग सेंटर (ईबीसी) नंतर दुसरे केंद्र आहे, जे कंपनीची नाविन्यपूर्ण उत्पादने व बी२बी सोल्यूशन्सना दाखवते.

सॅमसंगमध्ये आमचा विश्वास आहे की व्यवसायांचे भविष्य सर्वोत्तम अनुभवांशी संबंधित आहे, जे मानवी-केंद्रित, कनेक्टेड व शाश्वत आहे. मुंबईतील बिझनेस एक्स्पेरिअन्स स्टुडिओमधून हा दृष्टिकोन दिसून येतो. या शोरूममध्ये उद्योजक वास्तविक विश्वातील वातावरणामध्ये आमच्या सर्वात प्रगत एआय-समर्थित नाविन्यतांशी संलग्न होऊ शकतात. स्मार्ट क्लासरूम्सपासून ऑटोमेटेड हॉटेल्सपर्यंत, सर्वोत्तम आरोग्यसेवा साधनांपासून पेपरलेस बँकिंगपर्यंत आम्ही डिजिटल परिवर्तन सक्षम करत आहोत, जे अर्थपूर्ण, कार्यक्षम असण्यासोबत मोठ्या प्रगतीसाठी डिझाइन करण्यात आले आहे. हा स्टुडिओ तंत्रज्ञानाला दाखवतो, तसेच या स्टुडिओमधून भारतातील व जगभरातील आमच्या सहयोगींसोबत सहयोगाने उद्योजकांचे भविष्य घडवण्याप्रती आमची कटिबद्धता देखील दिसून येते," असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पर्क म्हणाले.




मुंबईमध्ये बीईएसच्या लाँचबाबत मत व्यक्त करत महाराष्ट्र सरकारचे माननीय माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार म्हणाले, आम्ही डिजिटल भारत मिशनला गती देत असताना एआय व व्हीआर सारखे उदयोन्मुख तंत्रज्ञान उद्योगांच्या कार्यसंचालन करण्याच्या, संस्थांच्या सेवा देण्याच्या आणि नागरिकांच्या विश्वाचा अनुभव घेण्याच्या पद्धतींना नवीन आकार देत आहेत. मुंबई या परिवर्तनामध्ये अग्रस्थानी आहे, तसेच नाविन्यता, सहयोग व भविष्यासाठी सुसज्ज परिसंस्थांना चालना देत आहे. सॅमसंगचा बिझनेस एक्स्पेरिअन्स स्टुडिओ या प्रवासामध्ये महत्वपूर्ण भर आहे, जो आमच्या व्यवसायामध्ये जागतिक तंत्रज्ञान नेतृत्व आणेल आणि डिजिटल नाविन्यतेसाठी आघाडीचे हब म्हणून महाराष्ट्राचे स्थान अधिक दृढ करेल."

मुंबईतील बीईएस स्टार्टअप्स, शाळा, हॉटेल्स, हॉस्पिटल्स व बँका अशा क्षेत्रांमधील क्लायण्ट्सना झोन्सच्या माध्यमातून सर्वोत्तम वॉकथ्रू अनुभव देतो. हे झोन्स वास्तविक विश्वातील स्थितींना दाखवतात, ज्यामुळे ते सर्वसमावेशक व्यवसाय वातावरणांमध्ये डिजिटल परिवर्तनाला चालना देण्यास सक्षम होतील.

उदाहरणार्थ, झोन १ मध्ये अभ्यागतांना शिक्षण, रिटेल व फायनान्स आणि आरोग्यसेवा अशा उद्योग क्षेत्रांसाठी डिझाइन करण्यात आलेले सर्वोत्तम सोल्यूशन्स पाहायला मिळतील. स्मार्ट क्लासरूम्स व कॅम्पस सोल्यूशन्समध्ये सॅमसंगचे नेक्स्ट-जनरेशन इंटरअॅक्टिव्ह डिस्प्ले, टॅब्लेट्स आणि डिजिटल नोटिस बोर्ड्सचा समावेश आहे, जे एकमेकांशी सुसंगत राहत काम करतात. तसेच डिजिटल जाहिरात सोल्यूशन्समधील नाविन्यता, सॉफ्ट पीओएस सिस्टम्स, इंटेलिजण्ट एअर क्वॉलिटी मॅनेजमेंट सिस्टम्स आणि प्रगत डायग्नोस्टिक इक्विपमेंट रिटेल व फायनान्स आणि आरोग्यसेवा क्षेत्रांमधील सोल्यूशन्सना साह्य करतात.

झोन २ ची थीम युनिफाईड सोल्यूशन्स आहे, जेथे सॅमसंग स्मार्ट थिंग्ज प्रो कनेक्टेड एआय-पॉवर्ड सिस्टम्ससह मीटिंग रूम्स व हॉटेल रूम्सच्या भविष्याला दाखवते, तर सॅमसंगचा क्रांतिकारी डिस्प्ले द वॉल' ऑटोमोटिव्ह, सरकार, आदरातिथ्य आणि कॉर्पोरेटमध्ये अनेक स्थितींसाठी स्क्रिनिंग सोल्यूशन्स डिझाइन करतो.

तसेच, मुंबईतील बीईएसच्या झोन मध्ये ग्राहकांना सॅमसंग उत्पादने मायक्रोवेव्ह, साइड-बाय-साइड रेफ्रिजरेटर्स, टीव्ही, एसी, फ्रण्ट लोड वॉशिंग मशिन्स असलेले सोल्यूशन्स पाहायला मिळतील, जेथे सह-राहणीमान व स्आर्टअप्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यवसायांच्या गरजांची पूर्तता होईल, तसेच व्यावसायिक क्षेत्रांसाठी सिस्टम एसीचे प्रदर्शन देखील आहे. स्मार्ट होम सोल्यूशन्सचा शोध घेत असलेल्या ग्राहकांना झोन ४ मध्ये कनेक्टेड बेडरूम्स, किचन्स व लिव्हिंग रूम्ससंर्भातील सोल्यूशन्स पाहायला मिळतील. तसेच सर्वोत्तम गेमिंग व होम सिनेमा झोन्समध्ये आधुनिक इनोव्हेशन्स पाहायला मिळतील, जे सर्वाधिक मागणी करणाऱ्या तंत्रज्ञान उत्साहींना अचंबित करतील.

## क्रेडिला फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडने ५,००० कोटी उभारण्यासाठी सेबी कडे यूडीआरएचपी दाखल केले

**मुंबई, २७ जुलै :** क्रेडिला फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (कंपनी) ही एक भारतीय शैक्षणिक वित्त संस्था असून, भारतात आणि परदेशात उच्च शिक्षण घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देण्यावर लक्ष केंद्रित करते. कंपनीने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस भाग भारतीय सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज बोर्ड कडे दाखल केला आहे. कंपनीची योजना प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री (आयपीओ) द्वारे निधी उभारण्याची असून, एकूण ५,००० कोटींच्या इश्यूमध्ये ३,००० कोटींचा नवीन समभाग विक्री प्रस्ताव आणि २,००० कोटी मूल्याचे ऑफर फॉर सेल यांचा समावेश आहे. हे सर्व समभाग १० दर्शनी मूल्यासह असतील.

५,००० कोटींच्या प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्रीतून (आयपीओ) होणाऱ्या २,००० कोटींच्या ऑफर फॉर सेलमध्ये, कोपवूर्न बी.व्ही. (प्रमोटर विक्री करणारे भागधारक) कडून ९५० कोटी आणि एचडीएफसी बँक लिमिटेड (इतर विक्री करणारे भागधारक) कडून १,०५० कोटींचा समभाग समाविष्ट आहे. सर्व समभागांचे दर्शनी मूल्य १० आहे. २००६ मध्ये स्थापन झालेली ही कंपनी उद्योग अहवालानुसार, भारतातील अनेक निकषांवर आघाडीची शैक्षणिक वित्त संस्था म्हणून ओळखली जाते.

कंपनी आपल्या निव्वळ उत्पन्नाचा वापर भांडवली गरजा पूर्ण करण्यासाठी, व्यवसाय आणि मालमत्तेच्या वाढीमुळे उद्भवणाऱ्या भविष्यातील गरजांसाठी भांडवली तळ अधिक मजबूत करण्यासाठी करणार आहे.

कंपनीने ६०० कोटींपेक्षा जास्त नसलेल्या एकूण रकमेसाठी रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस आरओसीकडे दाखल करण्यापूर्वी, बीआरएलएमशी सल्लामसलत करून निर्दिष्ट सिक्युरिटीजचे प्री-आयपीओ प्लेसमेंट केले जाऊ शकते. जर प्री-आयपीओ प्लेसमेंट केले गेले तर, बीआरएलएमशी सल्लामसलत करून कंपनीने ठरवलेल्या किंमतीवर असेल. जर प्री-आयपीओ प्लेसमेंट केले गेले तर, प्री-आयपीओ प्लेसमेंटमधून उभारलेली रक्कम नवीन इश्यूमधून कमी केली जाईल, जो ऑफरने सुधारित सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (रेग्युलेशन) नियम, १९५७ च्या नियम १९(२)(बी) चे पालन केले पाहिजे. जर प्री-आयपीओ प्लेसमेंट केले गेले तर, नवीन इश्यूच्या २०% पेक्षा जास्त नसावे.

उद्योग अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२४ ते २०२५ दरम्यान नेट कर्जवाढीच्या वर्षानुवर्ष वाढीच्या दृष्टीने ४७.६७% वाढ नोंदवत, क्रेडिला फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक वेगाने वाढणारी शैक्षणिक-केंद्रित नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी आहे.

ही कंपनी सध्या भारतातील सर्वात मोठी शैक्षणिक-केंद्रित आहे (ती, आणि एकूण तीन कंपन्यांचा समावेश असलेल्या पीअर सेटमध्ये), ज्याचे ३१ मार्च २०२५ पर्यंतचे नेट कर्ज ४१,४६९ कोटी आहे. कंपनीचा पुनर्रचित करानंतर नफा आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ९९० कोटी इतका होता. त्याचबरोबर, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १४,०८९ कोटींचे सर्वाधिक वितरण नोंदविणारी ही कंपनी ठरली आहे. (कारण आर्थिक वर्ष २०२५ साठी इतर समकक्ष कंपन्यांचा डेटा उपलब्ध नाही.)

उद्योग अहवालानुसार, क्रेडिला फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड ही (तीस कंपन्यांच्या पीअर सेटसह) भारतातील सर्वात वेगाने वाढणारी शैक्षणिक-केंद्रित नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी ठरली आहे. या कंपनीने आर्थिक वर्ष २०२३ ते २०२५ दरम्यान नेट कर्ज मध्ये ६४.९६% चा वार्षिक संमिश्र वाढ दर नोंदविला आहे, तसेच ३१ मार्च २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता मध्ये ८४.२६% ची वर्षानुवर्ष वाढ दर्शविली आहे. (ही तुलना आर्थिक वर्ष २०२४ साठी करण्यात आली आहे, कारण आर्थिक वर्ष २५ साठी पीअर डेटाची अनुपलब्धता आहे.)

या आयपीओ इश्यूसाठी ॲक्सिस कॅपिटल लिमिटेड, सिटीग्रुप ग्लोबल मार्केट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, गोल्डमन सॅक्स (इंडिया) सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड, आयआयएफएल कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड (पूर्वी आयआयएफएल सिक्युरिटीज लिमिटेड) आणि जेफरीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्या बुक रनिंग लीड मॅनेजर्स म्हणून कार्यरत आहेत.


## आज का अंदाज

सोमवार २८ जुलै २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 2 | 3 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 246 | 346 | 790 | 234 |
| 390 | 490 | 880 | 379 |
| 480 | 580 | 600 | 478 |
| 21 | 31 | 60 | 90 |
| 27 | 37 | 68 | 98 |
| 24 | 34 | 65 | 95 |

मुंबई बाजार

| 2 | 5 | 6 | 7 |
|---|---|---|---|
| 129 | 258 | 268 | 124 |
| 200 | 780 | 367 | 278 |
| 345 | 690 | 466 | 340 |
| 24 | 54 | 61 | 71 |
| 20 | 58 | 63 | 73 |
| 28 | 50 | 69 | 79 |

२८ जुलै २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 73 | 83 |
| 12 | 42 | 75 | 85 |
| 16 | 46 | 79 | 89 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## कुमकुम भाग्यमध्ये मेघा प्रसादचा झंझावाती प्रवेश, साकारणार सोनालिका ही भूमिका!



**मुंबई, २७ जुलै :** झी टीव्हीवरील सर्वांची आवडती मालिका कुमकुम भाग्य आपल्या सतत बदलणाऱ्या नात्यांमधील गुंतागुंत आणि भावना यांच्या प्रवाहातून प्रेक्षकांचे लक्ष कायम वेधून घेत आहे. प्रत्येक वळणावर नवे खुलासे आणि प्रचंड नाट्य पाहायला मिळत आहे. अलीकडेच जेव्हा शिवांश (नमिक पॉल) आणि प्रार्थना (प्रणाली राठोड) आपले जुने मतभेद बाजूला ठेवून नव्या सुरुवातीकडे वाटचाल करू लागले होते, तेव्हाच सोनालिकाच्या पुनरागमनामुळे त्यांच्या भूतकाळाची सावली पुन्हा त्यांच्या आयुष्यात आली. या वेळी सोनालिकाची भूमिका साकारत आहे प्रसिद्ध अभिनेत्री मेघा प्रसाद, जिने या मालिकेत झंझावाती प्रवेश केला आहे. याआधी ही भूमिका रूपम शर्माने साकारली होती, आणि आता मेघा या ताकदवान भूमिकेला नव्या उंचीवर नेण्यास सज्ज आहे.

आपल्या प्रभावी भूमिकांसाठी ओळखली जाणारी मेघा प्रसाद ही भूमिका खूपच सहजतेने साकारत आहे. बळकट स्क्रीन उपस्थिती, भावनिक खोली आणि अनेक स्तर असलेल्या व्यक्तिरेखेचा आत्मविश्वासपूर्ण अभिनय यांसह मेघा नवीन आणि तरीही गहन ऊर्जेसह सोनालिका साकारणार आहे. सोनालिकाचे पुनरागमन केवळ शिवांश आणि प्रार्थनाच्या आयुष्यात वादळ घेऊन येणार नाही, तर ती रौनक (अक्षय देव बिंद्रा) सोबत एक गुप्त करारही करते, कारण रौनक आधीच राग आणि सूडाच्या भावनेने पेटून उठलेला आहे. रौनकची कारस्थाने आणि सोनालिकाच्या योजना, शिवांश आणि प्रार्थनाच्या नव्या नात्याला मोठ्या संकटात टाकणार आहेत.

आपल्या भूमिकेबद्दल मेघा प्रसाद म्हणाली, सोनालिकाची व्यक्तिरेखा माझ्यासाठी खूप खास आहे. ती निडर आहे, भावनिक आहे आणि जे हवे असते ते मिळवण्यासाठी बिनधास्त आहे. मला तिच्यातली ही गोष्ट आवडते की ती परफेक्ट होण्याचा प्रयत्न करत नाही तिला आपल्या कमतरता माहिती आहेत आणि त्याच ती आपल्या ताकदीने वापरते. रौनकसोबत तिची जी जोडी झाली आहे, त्यात केवळ ड्रामा नाही तर त्यात रणनीति आहे, भावना आहेत आणि थोडेसे धाडसही आहे. कलाकार म्हणून सोनालिकामधील असूया, तिचे धैर्य आणि तिच्या अनेक छटा साकारणे माझ्यासाठी रोमांचक आणि आव्हानात्मक होते. ही अशी व्यक्तिरेखा आहे जी सतत बदलते, चकित करते आणि खूप खरी वाटते. प्रेक्षक पुढे काय पाहणार आहेत याची मला उत्सुकता आहे.

सोनालिकाचे भावनिक पुनरागमन आणि रौनकच्या नीट आखलेल्या योजना यामुळे कुमकुम भाग्य आता एका थरारक वळणावर पोहोचली आहे. पण काय सोनालिका तिला कायमच आपले वाटलेले प्रेम पुन्हा मिळवू शकेल?

## राष्ट्रीय पालक दिनानिमित्त झी टीव्हीच्या कलाकारांनी शेअर केल्या बालपणीच्या आठवणी

**मुंबई, २७ जुलै :** राष्ट्रीय पालक दिन आपल्याला आईवडिलांच्या शांत ताकदीची, अढळ प्रेमाची आणि आयुष्याला आकार देणाऱ्या संस्कारांची जाणीव करून देतो जे त्यांच्या शब्दांत, कृतीत आणि रोजच्या छोट्या मोठ्या त्यागांमधून आपल्या आयुष्यात उतरतात. ते आपल्या सुरुवातीच्या आठवणींचे आधारस्तंभ असतात आणि भविष्यातील व्यक्तिमत्व घडवणारे शिक्षकही. या खास दिवशी झी टीव्हीवरील काही लोकप्रिय कलाकार सरू मधील मोहक मटकर, वसुधा मधील प्रिया ठाकूर, जाने अनजाने हम मिले मधील भरत अहलावत, जागृति एक नयी सुबह मधील सागर पारिख, जमाई नंबर १ मधील सिमरन कौर आणि तुम से तुम तक मधील निहारिका चौक्सी हे त्यांच्या आईवडिलांनी त्यांच्या आयुष्यात काय स्थान आणि भूमिका बजावली याबाबत सांगत आहेत. स्वयंपाकघरात आईसोबतचे प्रेमळ क्षण असोत किंवा ऑडिशननंतर वडिलांकडून मिळालेली कठोर शिकवण हे कलाकार आजही त्यांच्या आईवडिलांच्या त्या नात्यामुळे रोज प्रेरणा घेतात आणि त्यांच्या आठवणी शेअर करत आहेत.

झी टीव्हीवरील 'सरू' मालिकेत सरूची भूमिका साकारणारी मोहक मटकर म्हणाली, माझ्यासाठी सगळे काही आमच्या छोट्याशा लिव्हिंग रूममध्ये सुरू झाले, जिथे मी आई-बाबांच्या समोर चित्रपटांमधले सीन सादर करायचे. तोच माझा पहिला स्टेज होता आणि तेच माझे पहिले प्रेक्षक. जेव्हा त्यांना वाटायचे की मी अजून चांगले करू शकते तेव्हा त्यांचे प्रोत्साहन आणि त्यांचा प्रामाणिकपणा यांनीच मला एक अभिनेत्री म्हणून घडवले. एक आठवण जी माझ्या मनात कायमची घर करून राहिली आहे ती म्हणजे आमच्या घरी साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाची धामधूम. त्या दिवसांत सगळा परिवार एकत्र यायचा हशा, संगीत, आईच्या हातचे मोदक आणि घरभर आनंदाचे वातावरण. लहानपणी जेव्हा कुणी पाहत नसायचे तेव्हा मी चोरून जास्त मोदक खायचे! या पालक दिनानिमित्त मला फक्त त्यांच्यासोबत बसून एक चित्रपट पाहायचा आहे, घरचे छान जेवण जेवायचे आहे आणि खूप गप्पा मारायच्या आहेत.

झी टीव्हीवरील 'वसुधा' मालिकेत वसुधाची भूमिका साकारणारी प्रिया ठाकूर म्हणाली, माझे आई-वडील नेहमीच माझे सर्वात मोठे पाठीराखे राहिले आहेत. जेव्हा जेव्हा ते मला सेटवर भेटायला येतात, त्यांच्या डोळ्यातला अभिमान पाहून वाटतं की सगळे संघर्ष सार्थकी लागले. माझ्या सगळ्यात आवडत्या आठवणींपैकी एक म्हणजे त्यांच्यासोबत साजरी केलेली दिवाळी लवकर उठून आईसोबत दिवे लावणे, रांगोळी काढणे, आणि बाबा आमच्या आवडत्या दुकानातून छान गोडधोड आणायचे. आम्ही सगळे छान कपडे घालून संध्याकाळी एकत्र फटाके वाजवायचो तो आनंद आणि एकत्र येण्याची भावना अजूनही मनात ताजी आहे. या पालक दिनी मी आमच्या जुन्या कौटुंबिक फोटोपैकी एक पुन्हा निर्माण करायचा प्लॅन करत आहे तीच पोझ, तोच ऊबदारपणा, फक्त या वर्षांमध्ये वाढलेले भरभरून प्रेम त्यात अधिक असेल.

झी टीव्हीच्या 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेत राघवची भूमिका साकारणारा भरत अहलावत म्हणाला, माझी आई ही माझ्या आयुष्यातली सर्वात मोठी प्रेरणा आहे. तिने जेव्हा जेव्हा जीवनातल्या गोष्टींना संयम, समतोल आणि प्रेमाने हाताळले, तेव्हा तिने मला अशा अनेक गोष्टी शिकवल्या ज्या कोणत्याही शाळेत शिकवल्या गेल्या नसत्या. मला अजूनही आठवतंय शाळेतून घरी आल्यावर मी माझी बॅग एका कोपऱ्यात फेकायचो आणि तिच्या शेजारी बसायचो, ती मला राजमा-चावल भरवायची. मी टेलिव्हिजन पाहताना दिवसभरात काय काय झालं ते न थांबता बोलायचो आणि ती फक्त हसत हसत शांतपणे ऐकत राहायची. त्या दुपारी खरं सांगायचं तर त्या निव्वळ जादू होत्या. या 'राष्ट्रीय पालक दिना'च्या निमित्ताने मी एवढंच सांगू इच्छितो आपल्या आई-वडिलांसाठी वेळ काढा. आयुष्य कितीही धावपळीचे असो, हे छोटे क्षण महत्त्वाचे असतात. कारण शेवटी त्यांचे अस्तित्व, त्यांचे प्रेम आणि त्यांनी केलेल्या त्यागांचेच खरे मोल असते.

झी टीव्हीच्या 'जमाई नं. १' या मालिकेत रिद्धीची भूमिका साकारणारी सिमरन कौर म्हणाली, आज मी जे काही आहे त्याचे संपूर्ण श्रेय माझ्या आई-वडिलांना - त्यांच्या मूल्यांना, त्यांच्या पाठिंब्याला आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला आहे. मला अजूनही आठवतंय, लहानपणी आईसोबत गेलेली शॉपिंगची ट्रिप्स ती मला ड्रेस निवडायला मदत करायची, वेगवेगळे लुक्स एक्सप्लोर करायला लावायची आणि मला स्वतःला व्यक्त करू द्यायची. ती केवळ फॅशन नव्हती, तर तिचा माझा आत्मविश्वास वाढवण्याचा आणि माझ्यातली सर्जनशीलता फुलवण्याचा एक सुंदर मार्ग होता, ज्यामुळे मी शेवटी अभिनयाकडे वळले. या पालक दिनानिमित्त, मी त्यांना कुठेतरी छोट्याशा ट्रिपवर घेऊन जाण्याचा विचार करतेय फक्त हसण्यासाठी, रिलॅक्स होण्यासाठी आणि नवीन आठवणी निर्माण करण्यासाठी. त्यांच्या प्रेमासारखा दुसरा आशीर्वाद माझ्यासाठी नाही.

झी टीव्हीच्या 'जागृति: एक नयी सुबह' या मालिकेत आकाशची भूमिका साकारणारा सागर पारेख म्हणाला, मी पाटण्याचा आहे, जिथे अभिनय ही पारंपरिक करिअर निवड नव्हती. पण माझ्या १२ वीच्या परीक्षेनंतर माझ्या आई-वडिलांनी मला पूर्णपणे पाठिंबा दिला ना कोणतेही प्रश्न, ना शंका, फक्त विश्वास. त्यांच्या त्या विश्वासामुळे मला मोठे स्वप्न पाहायची हिंमत मिळाली. एक आठवण मला कधीच विसरता येणार नाही उन्हात खेळून घरी आल्यावर आईने दिलेला थंडगार सत्तूचा शरबत, त्या एका ग्लासमध्ये जणू जादू असायची. अजूनही, शूटिंगच्या लांब दिवसांमध्ये मला त्याची चव आठवते. तो केवळ एक पेय नाही, तर प्रेमाची आठवण आहे. या पालक दिनानिमित्त, मला फक्त त्यांच्यासोबत बसून थोडे हसायचे आहे, एकत्र जेवायचे आहे, आणि त्यांना सांगायचे आहे की ते माझ्यासाठी किती महत्त्वाचे आहेत.

## सॅमसंग ॲड्स आणि कांतार यांनी केलेल्या संशोधनामधून खरेदी उद्देशाला चालना देण्यामध्ये कनेक्टेड टेलिव्हिजन्सची वाढती भूमिका दिसून येते

**मुंबई, २७ जुलै :** सॅमसंग ॲड्सने कांतारसोबत सहयोगाने बीयॉण्ड अवेअरनेस नावाची उल्लेखनीय श्वेतपत्रिका जारी केली, जिचा महत्त्वपूर्ण ब्रँड केपीआयना चालना देण्यामध्ये कनेक्टेड टीव्ही (सीटीव्ही) जाहिरात परिसंस्थेची भूमिका निदर्शनास आणण्याचा मनसुबा आहे. ओईएम कनेक्टेड टीव्ही कंपनीकडून पहिल्यांदाच अशाप्रकारचे संशोधन करण्यात आले आहे, जे मध्यम-ते-अल्प फनेल मेट्रिक्समधील प्रबळ, डेटा-संचालित माहिती देते, तसेच जाहिरातदारांना कनेक्टेड टीव्ही ब्रँडची अनुकूलता आणि खरेदी उद्देशाला देत असलेल्या चालनेबाबत स्पष्ट पुरावा देते.



या संशोधनामध्ये विविध उद्योग व भौगोलिक क्षेत्रांमध्ये सॅमसंग स्मार्ट टेलिव्हिजन्सवरील मोहिमांसाठी कांतारने केलेल्या १०० हून अधिक ब्रँड लिफ्ट स्टडींचे विश्लेषण करण्यात आले. कांतारकडून स्वतंत्र प्रमाणीकरणासह हे संशोधन कनेक्टेड टीव्हीमध्ये गुंतवणूक करणाऱ्या जाहिरातदारांना अभूतपूर्व स्पष्टता आणि आत्मविश्वास देते. ब्रँड अनुकूलता, संदेश सहयोग, ऑनलाइन जाहिरात जागरूकता आणि खरेदी उद्देश यांसारख्या ब्रँड लिफ्ट मेट्रिक्सचा वापर करून मोहिमांचे मूल्यांकन करण्यात आले, ज्यामुळे वास्तविक ग्राहक वर्तनावर प्रभाव पाडण्यात कनेक्टेड टीव्हीची क्षमता दिसून आली.

आपले मत व्यक्त करत सॅमसंग ॲड्स इंडियाच्या इनसाइट्स अँड क्लायण्ट सोल्यूशन्सच्या प्रमुख भावना सैंचर म्हणाल्या, 'बीयॉण्ड अवेअरनेस' संशोधन जागरूकता आणि विचारशीलतेला चालना देण्यासाठी महत्त्वाचे टचपॉइण्ट म्हणून कनेक्टेड टेलिव्हिजन्सच्या वाढत्या महत्त्वावर भर देते, तसेच दृश्यमानता वाढवते आणि मोठ्या स्क्रिन्सवर प्रेक्षकांशी संलग्न होणाऱ्या ब्रँड्ससाठी सकारात्मक निष्पत्ती देते. मला विश्वास आहे की, जनरेशन झेडचा उच्च सहभाग डिजिटल-प्रेमी, स्वावलंबीपणे निर्णय घेणाऱ्या प्रेक्षकांसह प्रभाव घडवून आणण्यास उत्सुक असलेल्या ब्रँड्ससाठी मोठी संधी आहे.

'कांतारच्या इनसाइट्स डिव्हिजनचे उपाध्यक्ष एबू इसाक म्हणाले,' कनेक्टेड टीव्ही संपूर्ण फनेल मार्केटिंग चॅनेलमध्ये बदलत असताना हे संशोधन त्याच्या धोरणात्मक मूल्याचे, विशेषतः तरुण प्रेक्षकांमध्ये अनुकूलता आणि खरेदीचा हेतू वाढवण्याचे आकर्षक पुरावे सादर करते. जाहिरातदार जनरेशन झेडशी अर्थपूर्ण संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करत असताना कनेक्टेड टीव्ही महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून उदयास येत आहे, जे अचूकता, प्रमाण आणि मोजता येण्याजोगा प्रभाव देते."

## राशीभविष्य

**मेष :** कोणत्याही प्रकारचा वाद टाळा. तुमच्या भावनांना योग्य दिशा द्या. कामाच्या ठिकाणी संयमाने काम करणे फायदेशीर ठरेल. व्यवसायातील अडथळे कमी होतील. राग टाळा.

**वृषभ :** आज नवीन व्यवसाय सुरू करणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील. तुमच्या नोकरीत तुम्हाला हवे असलेले काम करायला मिळेल. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जवळीक वाढेल.

**मिथुन :** व्यवसायात नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्याने नफा होईल. राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना पगार पॅकेजमध्ये वाढ होण्याची चांगली बातमी मिळेल.

**कर्क :** कामाच्या बाबतीत घाईघाईत कोणताही मोठा निर्णय घेऊ नका. व्यवसायात नवीन स्रोत उघडतील. नोकरीत बढतीची शक्यता असेल. प्रिय व्यक्तीमुळे सामान्य आदर आणि प्रतिष्ठा वाढेल.

**सिंह :** भागीदारीच्या कामात जास्त काळजी घेण्याची गरज असेल. व्यवसायाच्या बाबतीत अचानक नफा मिळण्याची शक्यता आहे. कला आणि अभिनय क्षेत्रात तुम्हाला मोठे यश आणि आदर मिळेल.

**कन्या :** न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. तुम्हाला काही महत्त्वाच्या कामात यश मिळेल. दूरच्या देशात सहलीला जाण्याची शक्यता असेल.

**तूळ :** आज, तुमचं महत्वाचं काम पूर्ण होईपर्यंत कोणालाही सांगू नका. अन्यथा, काम बिघडू शकतं. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. कठोर परिश्रम करून परिस्थिती सुधारेल.

**वृश्चिक :** आज तुमच्या महत्त्वाच्या कामांबद्दल तुमच्या विरोधकांना सांगू नका. तुमच्या योजना गुप्तपणे पूर्ण करा. विरोधक त्यात अडथळे निर्माण करतील. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांशी समन्वय साधा.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाचा आणि प्रगतीचा असेल. तुमचे प्रलंबित काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. विरोधकांशी व्यवहार करताना काळजी घ्या.

**मकर :** आज तुम्हाला तुमच्या कामात काही महत्त्वाचे यश मिळेल. प्रत्येक परिस्थितीत तुमच्या कामाबद्दल गंभीर रहा. प्रलंबित काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. संयम ठेवा. व्यवसायात नवीन भागीदार मिळतील.

**कुंभ :** तुमच्या समस्या जास्त वाढू देऊ नका. त्या लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. कामाच्या ठिकाणी संघर्ष वाढू शकतो. शहाणपणाने काम करा. उगाच वाद घालू नका.

**मीन :** तुमचे मन कामात व्यस्त ठेवण्याचा प्रयत्न करा. मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. राजकारणातील तुमचे विरोधक सक्रिय होऊ शकतात. व्यवसायात नवीन भागीदार तुमची फसवणूक करू शकतात.

## शब्दकोडे क्रमांक २१७६




**आडवे शब्द :-**
१) देवकीचा पुत्र, श्रीकृष्ण
५) रक्तवाहिवानी, धमनी
८) थोडेसे नुकसान किंवा दुखापत फुगवून सांगणे
१०) बाण
११) फिकीर
१२) युद्धातील एक घोषणा
१५) सुसर
१८) सारखा
२०) सापाची एक जात
२१) हाणामारी
२२) आवाजांचा गोंधळ
२३) विचार, सल्ला, चर्चा
२५) मत देणारा
२७) दारूचा एक प्रकार
२८) बारीक केस
३०) साखरेचा रस
३१) शिखराचे टोक
३२) बैलाच्या नाकात ओवलेली दोरी
३३) मजबूत
३५) रव्याचा एक गोड पदार्थ
३६) एक शस्त्र
३८) पाठविलेला
४०) निकट
४२) रसाने भरलेले
४६) तहाचे कागद
५०) पैसा, ममता
५१) एक मिश्र धातू
५३) करारातील दोन शब्द
५५) पूर्वेकडील एक राज्य
५७) नेत्र
५८) त्वरीत
६०) कसाबसा
६१) दहाचा समूह
६२) अभिनेता
६३) टाळता न येणारे
६४) वाहून नेण्याची क्रिया
६५) विद्या
६७) दया, करुणा
६८) भगर
६९) श्रीमंत दैववान
७१) आसक्त होणारा
७३) लाकूड कापण्याचे हत्यार
७५) अवस्था
७७) सापाने टाकलेली त्वचा
७८) खस
७९) लहानथोर
८०) वेगाने चालणे

**उभे शब्द :-**
१) राष्ट्र
२) शरमणे
३) मग, मागाहून
४) एक श्वासरोग
५) नरसिंह
६) च्या बरोबर
७) यज्ञ
८) डोळ्यात पाणी आणणारा कंद (अ व)
९) सुनील ***** एक थोर क्रिकेटपटू
१३) रक्त सांडणे
१४) सोनेरी शाई
१६) उष्ण
१७) वर वधूची मिरवणूक
१९) ढाक्याचे प्रसिद्ध कापड
२०) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
२१) धनी
२४) समतल
२५) चामखीळ
२६) वैरी
२९) दावानल
३१) भयंकर
३४) कापडी भिंत
३७) नवी, न वापरलेली
३९) साडीचा काठ
४१) ताठा, अहंकार
४३) ऐक्य, पूर्ण भरतीची वेळ
४४) भयंकर
४५) तृषित
४७) उपस्थित
४८) मातीचा वास येऊ लागलेला
४९) व्रत
५२) स्तोत्र
५४) रसवान
५५) संगीतातील एक राग
५६) श्रीकृष्णाचे एक नाव
५९) बडबड, वटवट
६३) दुर्दशा, दुश्चिन्ह तेजोहीनता
६५) हात
६८) भारताच्या दक्षिणेकडील राष्ट्र
७०) दिवस
७२) विश्वास, अब्रू
७४) व्रत
७५) मगज
७६) होडी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



सोमवार, दि. २८ जुलै २०२५

# चंद्रपूर महासागर

पान ६

## कला वाणिज्य महा. येथे करियर संसद

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २७ जुलै :** तालुक्यातील कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी येथे मंगळवार ला करियर कट्टा ह्या विभागाद्वारे करियर संसदेची स्थापना बी. ए. द्वितीय विद्यार्थ्यांची विविध पदांवर निवड करून करण्यात आली.कार्यकारी प्राचार्य डॉ. व्हि.एन. ठावरी यांनी मुख्यमंत्री म्हणून जया देशकर यांना शपथ दिली. नियोजन मंत्री म्हणून मयुरी दडमल, कायदे व शिस्तपालन मंत्री म्हणून मंजुषा गोहणे, सामान्य प्रशासन मंत्री म्हणून श्रद्धा रोकडे, माहिती व प्रसारण मंत्री म्हणून भावना येरूनकर, उद्योजकता विकास मंत्री म्हणून सानिया उपरकर, रोजगार व स्वयंरोजगार मंत्रीपदी निवड.

## गरीब दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मदत

**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २७ जुलै :** ब्रम्हपूरी येथील स्टेम पोद्दार लर्न स्कूल येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी पालक मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला वर्ग १ ते ५ या पालक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. मुख्याध्यापिका डॉ. भावना डोंगरदिवे यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करत शाळेच्या शैक्षणिक धोरणांबाबत सविस्तर माहिती दिली.या सत्रात शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम, दिनचर्या, शालेय उपक्रम व मूल्यशिक्षणावर प्रकाश टाकला. पालकांना त्यांच्या जबाबदाऱ्या व शाळेशी असलेली भागीदारी याचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी पालकांनी आपले प्रश्न विचारले.

## वॉरंटशिवाय पोलिसांचा तरुणावर अमानुष अत्याचार

### पोलिस अधिकारी नरोटे आणि पथकावर कारवाई करा, पत्रकार परिषदेत पिडीत आईची मागणी




**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २७ जुलै :** पिडीत युवक आनंद गेडामची आई अनिता गेडाम यांनी पत्रकार परिषदेत घराचा दरवाजा तोडून घरात प्रवेश करणाऱ्या आणि तिच्या मुलाला जबरदस्तीने घेऊन जाणाऱ्या आणि अमानुष अत्याचार करणाऱ्या पोलिस अधिकारी आणि त्यांच्या पथकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तिने सांगितले की, ती मित्रनगर येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या मागे राहते. २४ तारखेच्या रात्री १ वाजता पोलिस अधिकारी देवराव नरोटे आणि त्यांच्या पथक समेत चार महिला पोलिस होते. त्यांनी कोणतीही सूचना आणि वॉरंटशिवाय घराचे गेट तोडले आणि दगडफेक करून बेकायदेशीरपणे घरात प्रवेश केला. यादरम्यान त्यांनी घरातील लोकांना शिवीगाळ केली आणि धमकी दिली.

आनंदचा फोटो घ्यायचा आहे असे सांगून मनमानी पध्दतीने वागण्यास सुरुवात केली. पोलिस कर्मचाऱ्यांचे असे वर्तन पाहून तिचा मुलगा आनंद गेडाम घरातून पळून गेला. लवकरच पोलिस अधिकारी आणि त्यांच्या पथकाने त्याला पकडले, रागंबर आणि ठाकूरच्या घरी नेले आणि तेथे अमानुष मारहाण केली. त्यामुळे तो बेशुद्ध पडला. बेशुद्ध अवस्थेत त्याला गल्लीत फेकून देण्यात आले. पोलिसांनी रुग्णवाहिका बोलावून त्याला सरकारी रुग्णालयात पाठवले आणि पोलिस तेथून निघून गेले असा आरोप पिडीत युवकाची आई अनिता गेडाम यांनी पत्रकार परिषदेत पोलिसांवर केला.

तिने पुढे सांगितले की, दुसऱ्या दिवशी फोन येताच कुटुंब त्याला सरकारी रुग्णालयात भेटण्यासाठी गेले. पिडीत आनंदची प्रकृती खूपच गंभीर होती. सीटी स्कॅन आणि इतर चाचण्यांनंतर डॉक्टरांनी त्याला तात्काळ नागपूर मेडिकलमध्ये रेफर केले. सध्या आनंद खाजगी पोद्दार रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये दाखल आहे आणि त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले. आनंद गेडाम यांना न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती अनिता गेडाम यांनी दिली.

पीडित अनिता गेडाम यांनी पोलीस अधिकारी देवराव नरोटे आणि त्यांच्या टीमवर तात्काळ कारवाई करावी आणि त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा, संपूर्ण घटनेची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि दोषींवर मानवाधिकार उल्लंघनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी पत्रपरिषदेच्या माध्यमातुन केली आहे.

## बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील प्रलंबित प्रकल्पांना गती द्यावी

### आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे स्पष्ट निर्देश



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि. २७ जुलै :** बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील पाणीपुरवठा, सिंचन सुविधा, शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता, शेतकऱ्यांना खतांचा पुरवठा आणि निवासी पट्टे वाटप यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर तातडीने कार्यवाही करावी, तसेच प्रलंबित विकास प्रकल्पांना वेग देण्यासाठी ठोस आणि परिणामकारक पावले उचलावीत, असे स्पष्ट निर्देश राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीत दिले.

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील विविध विकास कामांसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील 'विस कलमी सभागृहात' आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मीना साळुंखे, उपविभागीय अधिकारी(चंद्रपूर) संजय पवार, अजय चरडे (मुल), बल्लारपूरच्या तहसीलदार रेणुका कोकाटे, विजय पवार (चंद्रपूर), संवर्ग विकास अधिकारी धनंजय साळवे,सहाय्यक कामगार आयुक्त प्रवीण कावळे आदींची उपस्थिती होती.

आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, पाणीपुरवठ्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. मौजा शिवनी चोर येथील २०० पैकी १५५ घरांना जल कनेक्शन देण्यात आले असून, उर्वरित टेकाडावरील घरांना लवकरच कनेक्शन उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, पळसगाव-आमडी परिसरातील जमीन अधिग्रहण व सिंचन प्रकल्पासंदर्भात लवकरच विशेष बैठक आयोजित करण्यात येईल. या भागातील शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यक्रम राबवण्यात यावेत. भाजीपाला उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी भाजीपाला क्लस्टर उभारणीची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी विभाग व सिंचन विभाग यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करावे. या बैठकीसाठी संबंधित क्षेत्राचे मुख्याधिकारी, सर्व गावांचे सरपंच तसेच गटविकास अधिकारी यांना निमंत्रित करण्यात यावे.

सिनाळा, नवेगाव व मसाळा या गावांतील घरांना मालमत्ताधिकाराचे पट्टे संबंधित जमिनीचे डी-नोटिफिकेशन पूर्ण झाल्यानंतरच वितरित करण्यात येतील. सिनाळा, नवेगाव व मसाळा या गावांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून विभागाकडे पाठवावा. स्थानिकांना रोजगार देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. स्थानिकांसाठी अस्तित्वात असलेले २० टक्के आरक्षण वाढवून ५० टक्क्यांपर्यंत करण्यासाठी प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवावा. बस स्टॉप, मंदिर, बोअरवेल आणि शाळा आदी सुविधा दर्जेदार करण्याकरिता आवश्यकता योजना कराव्यात. २०५० ची लोकसंख्या गृहित धरून पाणीपुरवठा योजना आखावी, असे केंद्र सरकारचे निर्देश आहे. या सूचनेमागील उद्देश भविष्यात लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या पाणी गरजांची योग्य पूर्तता करणे हा आहे. त्यानुसार ग्रामीण भागात ७० लिटर याप्रमाणे पाणी वापर गृहीत धरून अंदाजपत्रक तयार करा. ५ ऑगस्टपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून अंदाजपत्रक पाठविण्यात येणार आहे. शिक्षण हेच देशघडणीचे प्रभावी माध्यम आहे, त्यामुळे शाळा या गुणवत्तापूर्ण, सुरक्षित असाव्यात.

**बल्लारपूर नगर परिषद क्षेत्रामधील निवासी पट्टे वितरित करण्याची कार्यवाही**

बल्लारपूर नगर परिषदेअंतर्गत शासकीय जागेवरील रहिवासी अतिक्रमण नियमानुकूलनांचे काम प्रगतीपथावर असून, एकूण २२ शीटवर कार्यवाही करण्यात आली आहे. या क्षेत्रात एकूण ४५९२ मालमत्ता असून, त्यापैकी १८ शीटवर २७७४ पक्की घरे आहेत. सध्या १०५८ घरधारकांकडून पट्ट्यासाठी अर्ज प्राप्त झाले असून, त्यामध्ये ८४८ पक्की घरे व २१० कच्ची घरे आहेत. या २१० कच्च्या घरांना स्वतंत्र पट्टे १५ ऑगस्ट रोजी वितरित करण्याची कार्यवाही करावी. तसेच, ४५२ पट्ट्यांच्या संदर्भात लवकरच मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात येईल. पट्टयाचे अभियान राबवण्यात यावे, जेणेकरून लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचा स्वतःच्या जागेचा पट्टा प्राप्त होईल. या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बल्लारपूर, विसापूर, चुनाभट्टी आणि अमितनगर या गावांमधील घरांना पट्टे देण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्यात यावी.

## शासनाच्या गलथान कारभारामुळे मागील आठ महिन्यापासुन निराधारांना मानधन मिळाले नाही

### शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे निराधारांवर आली उपासमारीची वेळ

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २७ जुलै :** चिमूर तालुक्यातील नेरी सह सर्व महसूल मंडळातील निराधारांना शासनाच्या गलथान कारभारामुळे मागिल आठ महीन्यापासुन मानधन मिळाले नसल्याने त्यांचेवर उपासमारीची पाळी महाराष्ट्र शासनाने आणली असल्याबाबत पोटतिडकीच्या भावना निराधारांत उमटू लागल्या आहेत.

निराधारांवर उपवासाची राहण्याची वेळ आली तरी शासन-प्रशासनातील जबाबदार लोकप्रतिनिधी – प्रतिनिधी हे या गंभीर समस्यांकडे अजिबात लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे.महाराष्ट्र राज्यासह चिमूर तालुक्यातील गलथान कारभारामुळे निराधारांना मानधना अभावी वंचित राहावे लागत आहे,हे कोणत्या मानुष्कीचे व जनकल्याण धोरणाचे लक्षणे आहेत हेच कळायला मार्ग नाही. जे बिपिएल धारक नियमित मानधनाचे लाभार्थी होते त्या निराधारांना या म्हातारपणात उदरनिर्वाह करण्यासाठी या मानधनाचा उपयोग होत नसेल तर केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार निराधारांना मारु इच्छितो काय ?हा प्रश्न अनेक निराधारांच्या मनात खंत व्यक्त करतो आहे.

याचबरोबर गेल्या आठ महीन्यापासुन जे निराधार लाभार्थी आर्थिक लाभातंर्गत वंचित केले गेले आहेत व वंचित ठेवले गेले आहेत,त्यांची आर्थिक स्थिती अतिशय दयनीय झाली असून त्या सर्व लाभार्थ्यांना केंद्र सरकारने व महाराष्ट्र सरकारने उघड्यावर आणून सोडले आहे. निराधारांना मागिल आठ महीन्यापासुन मानधनाची वाट पहावी लागत असल्याने महाराष्ट्र शासन निराधारांच्या प्रति इतके असंवेदनशील कसे काय झाले आहे हा प्रश्न सुध्दा अधिकच गंभीरता निर्माण करतो आहे.

निराधार म्हाताऱ्यांना मिळणारे अनुदान या उतारवयात उदरनिर्वाहसह शारीरिक व्याधींवरच खर्च होत असते.परंतु ते ही वेळेवर मिळत नसल्याने निराधार चांगलेच आर्थिक अडचणीत आण निराश्रित झाले आहेत. तालुका प्रशासनाकडे खेटे घालुन सुद्धा निराशा पदरी पडत आहे असे लाभार्थी सांगत आहेत. यामुळे निराधारांना मानधन देण्यासंबंधाने प्रशासनातील संबंधित वरीष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

## सुपर १०० योजनेचा प्रारंभ

**चंद्रपूर:** अंगात जिद्द, चिकाटी व शिक्षणप्रती गोडी असतांना देखील घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे शहरातील महागडे शिक्षण घेण्यापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटून त्यांना दर्जेदार शिक्षण सोबतच निवास व भोजन व्यवस्था मोफत उपलब्ध व्हावी. जेणेकरून ग्रामीण भागातील गोरगरीब होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण होईल या उदात्त हेतूने चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी चांदा ज्योती सुपर - १०० या योजनेचा प्रारंभ केला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अनेकदा आर्थिक परिस्थितीचा विचार लक्षात घेता शिक्षणापासून माघार घ्यावी लागते. आजवर अशा अनेक प्रतिभावान विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाअभावी भविष्या घडवता आले नाही.

## आमराई वॉर्डात मुख्यमंत्र्यांच्या आरोग्यासाठी महाआरती

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**घुग्घू, दि. २७ जुलै :** अमराई वार्ड उडिया परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उत्तम आरोग्यसाठी माऊली मंदिरात महाआरती करण्यात आली.

यावेळी घुग्घुस येथील भाजपा महिला आघाडी आ.किशोर जोरगेवार यांच्या मार्गदर्शनात



मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त उत्तम आरोग्यसाठी भाजपा महिलांनी केली महाआरती.

आ.किशोर जोरगेवार यांच्या मार्गदर्शनात मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ यांच्या माऊली मंदिरात दिर्घ आयुष्यासाठी वनिता निहाल यांनी सर्व महिला पदाधिकारी एकत्रीत करून महाआरती करण्यात आले.याप्रसंगी उडिया वार्डातीलआ. जोरगेवार समर्थक महिला वनिता भोदेव निहाल,माजी.बहुजन समाज आघाडी शहर अध्यक्षा उषाताई गौतम आगदारी,ज्योती बावरे,संध्या जगताप,माया माडवकर, विनाती बाग,अंबिका दुर्गा,निर्मला दिप,केसवंती बाग, शारदा, अल्का, भा.ज.पा. नेते व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होते.

## देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह निमित्त अमृता फडणवीस उद्या सोमवारी चंद्रपुरात



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २७ जुलै :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने सुरू असलेल्या देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह अंतर्गत आयोजित विविध सामाजिक उपक्रमांसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस उद्या (सोमवार) चंद्रपूर दौऱ्यावर येत असून, त्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

दुपारी ३ वाजता अमृता फडणवीस यांचे चंद्रपूर येथे आगमन होईल. त्यानंतर त्या आमदार किशोर जोरगेवार यांच्या कोतवाली वार्ड येथील 'राजमाता निवास' या निवासस्थानी भेट देतील. दुपारी ३.३० वाजता २०५५ विद्यार्थ्यांपैकी ५५ विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करून सायकल वितरण कार्यक्रमाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम 'राजमाता निवास' येथेच होणार आहे.

दुपारी ४ वाजता अमृता फडणवीस छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जीवनपटावर आधारित चित्रप्रदर्शनीची पाहणी करतील.

यानंतर ४.२५ वाजता भिवापूर येथील शिवलिंग परिसरात आयोजित महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या शिवलिंगाचे त्यांच्या हस्ते पूजन करण्यात येणार आहे. येथे एक लाख ५५ बेलपत्रे आणि ५५ नद्यांच्या पवित्र जलाने शिवलिंगाचा जलाभिषेक करण्यात येणार आहे.

## औद्योगिक क्षेत्रातील कंत्राटी निविदा व पदभरतीची माहिती सर्वापर्यंत पोहोचवण्याची प्रक्रिया राबवा : सुरज ठाकरे



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २७ जुलै :** औद्योगिक जिल्हा म्हणून नावलौकिक असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. सदर बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार मिळावा याकरिता जय भवानी कामगार संघटना ही सातत्याने प्रशासन दरबारी कागदोपत्री पाठपुराव्यासह वेळोवेळी आंदोलन, उपोषण करत आलेली आहे. महत्त्वाची बाब म्हणजेच ङचंद्रपूर जिल्ह्यातील सिमेंट कंपन्या, कोळसा खाणीसह इतरही औद्योगिक क्षेत्रात कंत्राटी कामांसाठी निविदा प्रक्रिया आणि त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या पदभरतीच्या संधी उपलब्ध संकेतस्थळाद्वारे स्थानिक नागरिकांपर्यंत पोहोचविल्या जात नाही.

यामुळे जिल्ह्यात नवीन कंपनी येऊन कामही सुरू करते मात्र कंत्राट संपुष्टात येईपर्यंत स्थानिक बेरोजगार तरुण रोजगार मिळावा या आशेने कंपनीच्या गेटवर फक्त चकरा मारीत अखेर निराश होऊन घरी परतत असतो. आणि स्थानिक भूमिपुत्रांचा रोजगार हिरावून बहुतांश परप्रांतीय कामगार हे कंपनीतील कंत्राटदारांच्या मदतीने कंपन्यांमध्ये काम करतांना आढळतात.

८०टक्के स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार मिळावा याकरिता ङजय भवानी कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरज ठाकरे यांनी महाराष्ट्र शासन तथा केंद्र शासन अंतर्गत येत असलेल्या कंपनीतील संबंधित अधिकाऱ्यांना सर्वसामान्य जनतापर्यंत पारदर्शकपणे जाहिरात व माहिती पोहोचवण्याची संकल्पना राबविणे बंधनकारक करून निविदा प्रक्रिया आणि त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या आवश्यक पदभरतीच्या संधी उपलब्ध संकेतस्थळाद्वारे स्थानिक नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोचवण्याची प्रक्रिया राबवून स्थानिक कौशल्यवान गरजू सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्याकरिता माजी कॅबिनेट मंत्रीआमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्याकडे २५ जुलै २०२५ ला निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

निविदा आणि पदभरती प्रक्रियेबद्दल सुरज ठाकरे यांनी केलेली मागणी : निविदा प्रकाशन: कंत्राटी कामांसाठी निविदा स्थानिक वृत्तपत्रे, सरकारी संकेतस्थळे आणि संबंधित कंपन्यांच्या अधिकृत वेबसाइट्सवर नियमितपणे प्रसिद्ध करण्यात यावी.पदांचे स्वरूप:- या निविदांमध्ये तांत्रिक, प्रशासकीय, सुरक्षा, स्वच्छता, बांधकाम, उत्पादन इत्यादी क्षेत्रांतील कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कामगारांसाठी पदे उपलब्ध करून देण्यात यावी. अर्ज प्रक्रिया:- इच्छुक उमेदवारांना शैक्षणिक पात्रतेनुसार प्रमाणपत्रे, अनुभव असल्यास प्रमाणपत्रे आणि ओळखपत्रांसह ऑनलाइन किंवा ऑफलाइन अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात द्यावी.निवड प्रक्रिया: लेखी परीक्षा अथवा मुलाखात आणि कौशल्य चाचणी यांच्या आधारे उमेदवारांची निवड करून ८०टक्के स्थानिकांना प्रथम प्राधान्य देण्याचे धोरण राबवावे.

## सर्व जिल्ह्यातील सीबीएसई शाळांना नागपंचमीची सुट्टी जहिर

### सिस्वा संघटनेच्या प्रयत्नांना मोठे यश



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २७ जुलै :** सीबीएसई शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्यायिक अधिकारासाठी लढणाऱ्या सीबीएसई स्कूल स्टाफ वेल्फेअर असोसिएशन (सिस्वा) ने २९ जुलै २०२५ ला येणाऱ्या नागपंचमी सणानिमित्त शिक्षण विभागाने निर्देशित केल्या नुसार वर्धा,भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सगळ्या सीबीएसई शाळेने सुट्टी जाहीर करण्याकरता सिस्वा च्या अध्यक्ष दिपाली डबली यांनी तशा प्रकारचे पत्र २४ जुलै २०२५ ला उपविभागीय संचालक माधुरी सावरकर, यांना देऊन नागपूर प्रमाणेच वर्धा,भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली येथील सर्व सीबीएसई शाळेने हि सुट्टी जाहीर करण्याबाबतची मागणी केलेली होती त्या अनुषंगाने सिस्वाच्या पहिल्या जनआंदोलनाचे फलित म्हणून १२ फेब्रुवारी २०२० रोजी डेप्युटी सेक्रेटरी ॲफिलिएशन (सीबीएसई) यांच्या स्वाक्षरीचे डिस्ट्रिक्ट एज्युकेशन ऑफिसर, जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांना पाठवलेल्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे गव्हर्मेंट ऑफ इंडिया तसेच तत्सम राज्य शिक्षण विभागाचे सर्व नियम त्या राज्यात असणाऱ्या सर्वच प्रकारच्या शाळांना लागू आहेत

ह्याचा संदर्भ घेऊन तसेच २४ जुलै ला सिस्वा तर्फे देण्यात आलेल्या मागणी पत्राचा संदर्भ घेऊन सिस्वाची ही न्यायिक व महत्वपूर्ण मागणी तातडीने मान्य करून उपविभागीय संचालक श्रीमती माधुरी सावरकर ह्यांनी सर्व प्राथमिक/ माध्यमिक शिक्षणाधिकारी तसेच गट शिक्षणाधिकारी व नागपूर विभागातील सर्व पंचायत समिती यांना निर्देशांचे परिपत्रक काढून दिनांक २९ जुलै २०२५ रोजी वर्धा,भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली येथील सर्वच सीबीएसई शाळेला नागपंचमी चि अनिवार्य सुट्टी घोषित करण्याबाबत निर्देशित केलेले आहेत.

तसेच सबंधित शिक्षण विभागाने निर्देशित केलेल्या वार्षिक सुट्ट्याचे सर्व सीबीएसई शाळे तर्फे काटेकोर पालन अनिवार्य असण्या बाबतचे ही निर्देश दिलेले आहेत.

सीबीएसई बायलॉज च्या एका नियमानुसार जिल्हा शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यातील सीबीएसई शाळांमध्ये जाऊन इन्स्पेक्शन करण्याचा अधिकार दिलेला आहे म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या सीबीएसई बायलॉज मध्ये नमूद केलेल्या नियमानुसार महत्त्वाचे सर्व अधिकार जिल्ह्यातील शिक्षण विभागाला सीबीएसई ने देऊ केलेले आहे.

## जिल्ह्यातील सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश

### राजस्थान दुर्घटनेनंतर आमदार देवराव भोंगळे यांची तातडीची मागणी



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २७ जुलै :** राजस्थानमधील झालावाड जिल्ह्यातील पिपलोडी येथे काल, २५ जुलै २०२५ रोजी प्राथमिक शाळेचे छत कोसळून झालेल्या हृदयद्रावक दुर्घटनेनंतर चंद्रपूर जिल्ह्यातही शाळांच्या इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिपलोडीच्या या दुर्घटनेत चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून, ३० ते ४० विद्यार्थी ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी राजुरा विधानसभेचे आमदार देवराव भोंगळे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद आणि खाजगी शाळांच्या इमारतींचे, विशेषतः जीर्ण आणि धोकादायक असलेल्या इमारतींचे, तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट (Structural audit) करण्याचे निर्देश काल (दि. २५) जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे दिले आहेत.

आमदार भोंगळे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, राजस्थानमधील दुर्घटनेतून बोध घेऊन चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. संभाव्य धोके ओळखून त्यावर वेळीच उपाययोजना केल्यास भविष्यात अशा क्लेशदायक घटना टाळता येतील.

या पत्राची जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेतली असून, संबंधित विभागांना यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश देत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कळविण्याचे आपल्या पत्रात नमुद केले आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबतच्या चिंतेचे निराकरण होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३
* स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

